NUTA BULLETIN
FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10
YEAR : 26 ) 1st April 2001 ( No : 3

# A G E N D A

**of the General Body Meeting of**
**NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION**
**to be held at 12.00 noon on**
***SUNDAY, the* 6th May, 2001 at**
**Bharatiya Mahavidyalaya, Amravati**

Agenda of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association to be held at 12.00 noon on Sunday, the 6th May,2001 at Bharatiya Mahavidyalaya, Amravati is as follows :-

## ITEM NO. 286 :
## *CONFIRMATION OF MINUTES :*

TO CONFIRM the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 17th September,2000 at R.L.T. Science College, Akola.

*Note :- 1) Copy of the minutes was circulated on pages 109 to 111 of 2000 NUTA Bulletin. 2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 17th September, 2000, at R.L.T. Science College, Akola. vide No.CIM/9 Dated 21st November 2000 published on page 118 of 2000 Nuta Bulletin. No correction was received.*

## ITEM NO. 287 :
## *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

TO CONSIDER AND TO APPROVE the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2000.

***Notes** : (i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association is prepared by the Executive Committee (vide item No.4 of 2001) and is to be placed for the approval of the General Body. (ii) The Copy of the Annual Report is circulated* in this *NUTA Bulletin on page 31 & 32 (iii) Prof. E.H.Kathale, Secretary will present the Annual Report on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 288 :
## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

TO APPROVE the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2001.

***Notes** : (i) Prof. S.A.Tiwari, Treasurer, NUTA, will present the Budget on behalf of the Executive Committee. (ii) The copy of the Budget is circulated on page No.31 of 2001 NUTA Bulletin.*

## ITEM NO.289 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

TO CONSIDER AND TO APPROVE the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2001 namely :-

**"C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas" Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2001"**

***Note** : (i) As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annuallly in the Annual Meeting of the Association.'' (ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution (Vide item No. 2 of 2001) which is now placed before the General Body for its approval. (iii) Prof. S.A.Tiwari Treasurer, on behalf of the Executive Committee, will move the resolution.*

## ITEM NO. 290 :
## *AMENDMENT TO THE CONSTITUTION OF NUTA*

To Consider and to approve the following Proposal for the amendment to the constitution of NUTA.

**PROPOSAL**

(1) In Article VII of the Constitution of NUTA for the words "Semi Government Corporations" the words

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**
**MEETING NOTICE : 2**
**Date : 30. 03. 2001**

From
**Dr.E.H.Kathale,**
Secretary, **NUTA,**
N-162 Reshim Bagh, Nagpur-440 009.

To,
**All the members**
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that in exercise of the powers conferred on it by Article VIII of the Constitution of NUTA, the Executive Committee has decided to have the meeting of General Body at **12.00 Noon** on the date and at the place mentioned below.

2. Agenda of the General Body meeting is printed in this NUTA Bulletin. If you propose to suggest any amendments to any of the proposals/Resolutions included in the Agenda, you may send it to me within a period of one week from the date of the posting of this Bulletin. It will not be possible for the amendments received after the due date to be included in the additional agenda. Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.

3. Rules for proposing amendments to the proposals/resolutions are printed on page 97 of 1977 NUTA Bulletin. You are requested to kindly make it convenient to attend the meeting.

Yours faithfully,
Sd/- **Dr. E.H.Kathale**
Secretary, NUTA

***Date and Place of the meeting***
**Sunday, the 6th May, 2001**
**at 12.00 Noon at,**
**Bharatiya Mahavidyalaya, Amravati**

" Semi Government Corporations or Scheduled Bank or Co-operative Bank" shall be substituted.

(2) The following proviso be added at the end of the Article VII, namely :-

Provided that the amount of deposit in any one Scheduled Bank or Co-operative Bank shall not be more than Rs. 1 Lac.

***Notes*** *: (1) Article X of the Constitution of NUTA reads as follows:-"(a) Proposal to amend the Constitution may come with fourteen clear days notice either from the Executive Committee or from one fifth of the total membership of the Association. (b) The Constitution shall stand amended if the proposal is approved by a majority of not less than two third of the members present and voting in its General Body Meeting."*

*(2) Text of the Constitution of NUTA is given on page 2 of 1978 NUTA Bulletin and reprinted as amended up to date on page 32,33 of 1993 NUTA Bulletin.*

*(3)Text of Article VII :-*

*" VII) The Treasurer shall be the custodian of the funds of the Association. He shall be responsible for maintaining the accounts of the Association. Long term fixed deposits, as mentioned in the second proviso of Article III, may be invested in fixed deposit Receipts of Nationalised Banks or in such units of Unit Trust of India or such other Securities of Government and* ***Semi Government Corporations*** *as may be decided by the Executive Committee and the accounts shall be operated jointly by the Secretary and the Treasurer of the Association. The General Body shall appoint auditors annually in the Annual meeting of the Association."*

## विषय क्र. २९१ :

## *नेटसेट बाबतचा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा आंदोलन कार्यक्रम*

नेटसेट ग्रस्त शिक्षकांच्या संदर्भात कृति आंदोलनाचा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने घोषित केलेला पुढील कार्यक्रम विचारात घेणे :-

"मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव, उच्च शिक्षणमंत्री, वित्तसचिव, उच्च शिक्षण सचिव यांनी सतत पाच दिवस, पाच पाच तास बसून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळासोबत चर्चा करुन काही निर्णय घेतले. त्या मतैक्यपत्रातील महत्वाचा निर्णय असा होता की, केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे महाराष्ट्रात वेतन पुनर्रचनेची अम्मलबजावणी करावयाची त्याला वित्त विभागाची मान्यता होती. याप्रमाणे २७.२.१९८९ चा शासननिर्णय निर्गमित झाल्यावर महाराष्ट्रातल्या अधिकाऱ्यांनी केंद्राच्या अटीमध्ये नसलेल्या अनेक अटी घुसडल्या. ३१ मार्च १९९४ ला त्यांना सेवामुक्त करा ही अट केंद्राने टाकलेली अट नव्हती. ३१ मार्च १९९५ ला त्यांना सेवामुक्त करा ही अट केंद्राने टाकलेली नव्हती. ३१ मार्च १९९६ ला त्यांना सेवामुक्त करा ही सुद्धा केंद्राची अट नव्हती. त्यांना ॲडहॉक नेमणूका द्या, हे केंद्राने सांगितले नव्हते, त्यांच्या वेतनवाढी रोखून ठेवा, हे केंद्राने सांगितले नव्हते. त्यांना वरिष्ठ जागावर प्रमोशन देऊ नका हे केंद्राने सांगितले नव्हते.

नेटसेट बाबत महाराष्ट्र शासनाची भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, तसेच केंद्र शासनाच्या धोरणाशी व महाराष्ट्र शासनाशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा जो समझोता झाला त्याच्याशी पूर्णपणे विसंगत रहात आली. तदर्थ स्वरूपाच्या नेमणुका देणे, सेवेत असलेल्या अधिव्याख्यात्यांना नेट सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करणे, न झाल्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा ज्येष्ठता न देणे या शासन निर्णयातील अटी संपूर्णपणे समझोत्याच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनांच्या सूचनांच्या विरुद्ध आहेत. त्यामुळे या अटी ताबडतोब मागे घेण्यात याव्या अशी मागणी महासंघाने सातत्याने केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनाच्या सूचनांच्या आधारावर झालेल्या समझोत्याचा भंग करणाऱ्या कोणत्याही अटी स्वीकारण्यास हे कार्यकारी मंडळ ठाम नकार देत आहे.

"शिक्षक म्हणून सेवेत येणारी व्यक्ती नेटसेटची पात्रताधारक असली पाहिजे", असा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एप्रिल २००० च्या रेग्युलेशनमधील मूळ नियम आहे. "परंतु असे की त्या त्या वेळी अस्तित्वात असलेली किमान विधिमय पात्रता धारण करणाऱ्या ज्या शिक्षकांची यथोचित निवड समितीमार्फत यापूर्वीच निवड झालेली आहे अशा शिक्षकांना "नेटसेट पात्रता" लागू असणार नाही", असे त्या नियमाचे परंतुक आहे. मूळ नियमात "नेटसेटची पात्रता" आवश्यक आहे. तर परंतुकामध्ये "हे नियम होण्याच्यापूर्वी त्या त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान विधिमय पात्रता" धारण करणारांना नेटसेटची पात्रता लागू रहाणार नाही असे विहित केले आहे. मूळ नियमातील पात्रता व परंतुकातील पात्रता म्हणजे दोनही ठिकाणी "नेटसेटचीच पात्रता" असा अर्थ मंत्रालयातील अधिकारी लावत आहेत. आपलाच अर्थ खरा आहे या आनंदात ते एवढे बेभान झाले आहेत की दोनही ठिकाणच्या पात्रतेचा अर्थ जर "नेटसेटची पात्रता" असाच आहे हे मान्य केले तर विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या मूळ नियमाला हे परंतुक जोडण्याचे काही कारणच उरत नाही याचेही भान या अधिकाऱ्यांना राहिलेले नाही.

शासनाने नेटसेटग्रस्त शिक्षकांच्या संदर्भात अवांच्छनिय व अनधिकाराने घुसडलेल्या अटी काढून टाकल्या नाहीत तर २ मे २००१ पासून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने महाराष्ट्रभर मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमाच्या वेळी जिल्ह्याच्या ठिकाणी काळे झेंडे दाखवून शांततापूर्वक निषेध निदर्शने आयोजित केली जातील."

## विषय क्र. २९२ :

## *अर्धवेळ अधिव्याख्यात्यांना नविन वेतनश्रेणी*

श्री.वि.रा.काथर्डेकर पुढील प्रस्ताव मांडतील :-

महाराष्ट्र शासनाने पूर्ण वेळ अधिव्याख्यात्यासाठी ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयान्वये पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा शासननिर्णय प्रसृत केला, त्यातील परिच्छेद १७ मध्ये अर्धवेळ अधिव्याख्यात्यांना जे कायम स्वरुपी आहेत, त्यांना सेवाकाळाच्या आधारावर उच्च वेतनश्रेणीत वेतनवाढ मिळेल असे सुचविण्यात आले. पण Higher placement तर दुरच राहिले. कायम स्वरुपी अर्धवेळ अधिव्याख्यात्यांना ८०००-२७५-१३५०० या साध्या वेतनश्रेणीची निम्मी म्हणजे, ४०००-१३७-५०-६७५० सुद्धा (नुटा बुलेटीन अंक १५ जुलै २००० पृ.सं. ७४-७५ मधील शुद्धीपत्रक क्रमांक वेपूर ६ 'अ' शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे-१ दिनांक २१ मार्च, २००० परिच्छेद १०) अजून लागू झालेली नाही. शासनाने याबाबतची कारवाई तातडीने पूर्ण करावी अशी ही सभा विनंती करीत आहे.

### नागपूर विद्यापीठाशी संलग्न वरिष्ठ महाविद्यालयातील गणित विषयाच्या कार्यभारातील त्रुटीबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन,२०००*

*गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर २०००*

(९) * ९२६७ **सर्वश्री प.म.पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प्रतापसिह मोहिते पाटील, सुभाष देशमुख, सुभाष दापके :** तारांकित प्रश्न क्र.७६०७ ला दिनांक १८ जुलै, २००० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय-

(१) महाराष्ट्र शासनाने २१ व २२ सप्टेंबर, १९७६ च्या ॲडव्हॉक कमेटीच्या शिफारशीनुसार विविध विषयांच्या कार्यभार ठरविण्यासाठी स्विकृती दिलेली असली तरी सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर ट्युटोरियलची संपूर्ण वर्गासाठी एक बॅच असा गैरअर्थ काढून गणित विषयाकरिता चुकीचा कार्यभार निश्चित करण्यासाठी बाध्य करतात अशी तक्रार करणाऱ्या निवेदनाबाबत शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाची छाननी पूर्ण झाली, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(३) अद्यापी छाननी पूर्ण झालेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** (१) नागपूर युनिव्हर्सिटी मॅथेमॅटीक्स टिचर्स असोसिएशनने दिनांक १८ डिसेंबर १९९८ रोजी मा.उच्च शिक्षण मंत्र्याना दिलेल्या निवेदनात नागपूर विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील गणित विषयाच्या कार्यभार निर्धारणाबाबत तफावत असल्याचे म्हटले होते. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी या निवेदनातील मागणीची छाननी करुन त्यांचा प्रस्ताव दिनांक ७ डिसेंबर १९९९ रोजी शासनास सादर केला आहे.

(२) या प्रस्तावानुसार गणित विषयाच्या ट्युटोरिअलकरिता १६ विद्यार्थ्यांची एक बॅच निर्धारित केल्यास कार्यभारात व पर्यायाने खर्चात वाढ होणार आहे. शासनाचे सध्याचे आर्थिक काटकसरीचे धोरण विचारात घेऊन शिक्षण संचालकांचा प्रस्ताव मान्य करण्यात आलेला नाही.

(३) वरील भाग (२) ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रश्न उद्‌भवत नाही.

**** एलसी/९२९ ****

# SECRETARY'S REPORT ON THE WORKING OF THE ASSOCIATION FOR THE YEAR ENDING ON 31st DECEMBER, 2000.

*Prepared by the Executive Committee of NUTA under article (VI) (b) (ii) of the Constitution of NUTA and presented by Secretary on behalf of the NUTA Executive.*

Dear friends,

**(1)** It gives me great pleasure to accord you all a cordial welcome on behalf of the Executive Committee of NUTA and my own behalf. It is indeed a proud privilege for me to place before this august body a brief account of our activities and achievements during the year 2000.

**(2)** Right from its inception, NUTA has been committed to the cause of the welfare of the teachers' community. In keeping with this commitment, the organisation took up several issues concerning teachers during the period of this report.

**(3)** During the current year, the organisation achieved success in getting a few of our demands fulfilled by the Government. The President of the organisation, Prof. B.T.Deshmukh followed up the issues in the legislative council with his usual perseverance and got the relevant orders issued by the Government. They include G.R. dated 27th January, 2000 on revision of pay scales of Medical Education drugs Department Teachers in Government/Dental and Ayurvedic Colleges and G.R. dated 1st January, 2000 on implementation of the Vth Pay Commission Scales to the Teachers and non-teachers working in non- government aided technical institutions at plus two level.

**(4)PARTICIPATION IN ACTION PROGRAMME:**

(a) The members of NUTA participated in the various action programmes in response to the call given by AIFUCTO and MFUCTO from time to time to press for the solution of pending problems of the teaching community. AIFUCTO had given a call of Dharna at New Delhi to highlight the demands of 1] More funds for Education in general and Elementary Education in particular. 2] No retreat of the government from funding higher education 3] Protect secular values in Education and resist communalisation of Education 4] Full implementation of agreement between AIFUCTO and the government of India. 5] Issue of orders on revision of pay scales in the states of Bihar and Assam 6] Immediate payment of full arrears by the Central Government to the states. A large number of teachers from Nagpur and Amravati University area participated in the Dharna.

(b) MFUCTO had given a call for letter agitation programme, which was to be undertaken between 1st November and 5th November, 2000. In response, hundreds of teachers from Nagpur and Amravati University area sent letters to the Chief Minister reiterating the contention of the organisation that the NET-SET qualifications were to the candidates and not to the teachers already in service.

**(5) COLLEGE UNIT AND TALUKA UNIT ELECTIONS :**

(a) The programme of college unit elections was announced and notice to that effect was issued on page number 58 of NUTA Bulletin of 2000. Accordingly, all the college unit elections were conducted smoothly on 24th April, 2000.

(b) Taluka units of NUTA were created for the first

## BUDGET FOR THE FINANCIAL YEAR - 2001-2002

OFFICIAL ACCOUNTING YEAR OF THE TRUST : 2001-2002 (AS PER SCHEDULE VII-A OF THE B.P.T.A. 1950)

***Name of the Trust*** : **NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION.**

Regn. of the Trust : B.P.T.A. Regn. No. F-1594 & Soc. Regn. Act. Regn. No. MAH-15-73(NGP)

| ESTIMATED RECEIPTS | RS. P. | ESTIMATED DISBURSEMENTS | Rs. P |
|---|---|---|---|
| **I. OPENING BALANCE :** | | **A) NON-RECURRING :** | |
| i) Cash in hand … … | … .. | i) Major Repairs or rebuilding | |
| ii) Cash in Bank … … | 15000 00 | of the assets etc. … | .. . .. |
| | | ii) Net purchase of immovable property … | … .. |
| **II. ESTIMATED RECEIPTS :** | | **B) RECURRING** : | |
| **(A) NON RECURRING** | | i) Rents, rates taxes etc. … | 2,000.00 |
| i) Ordinary Donations to be | | ii) Administrative Expenses … | … .. |
| received for specific earmarked | | a) Stationery, Typing , | |
| objects (permanent subscription | | Cyclostyling & Printing . … | 1,50,000.00 |
| to NUTA Bulletin) … … | … .. | b) Travelling Expenses . … | 30,000.00 |
| ii) Ordinary Donations … | … .. | c) Postage and Telephone. … | 10,000.00 |
| | | d) Misc. expenses … | 4,000.00 |
| | | e) Bank commission … | 400.00 |
| **(B) RECURRING** : | | f) Legal Expenses … | 1000.00 |
| i ) Rent etc. on immovable property | … .. | g) Audit fees … | 1500.00 |
| ii) Interest on Fixed Deposits | | h) Affiliation fees … | |
| iii) Dividend shares etc … | 200000 00 | i) MFUCTO … | 4000.00 |
| iv) Income from Agri. land … | … .. | ii) AIFUCTO … | 1600.00 |
| v) Other revenue Receipt … | … .. | iii) Contribution to public | |
| vi) Legal Aid Fund … | … .. | trust\ admn. Fund … | |
| | | vi) Books Library | 8,000.00 |
| **III.REALISATION FROM** | | iii) Payment of Salaries … | 2,400.00 |
| **DISPOSAL OF ASSETS** : | … .. | iv) Transfer of Depreciation Fund | |
| | | v) Special & Current repairs of building | |
| **IV EXCESS OF EXPENDITURE** | 7900.00 | Furniture etc … | 8,000.00 |
| **OVER INCOME :** … | … .. | vi) Excess of income over expenditure … | |
| **TOTAL Rs.** | **2,22,900 00** | **TOTAL Rs.** | **2,22,900.00** |

**NOTE** : Estimated enrolment of members during the year is expected to be 10. On this account the association will receive an estimated amount of Rs. 40,010/- However this amount cannot be included in the estimated receipts because this amount is to be invested in fixed deposit receipts or any other Govt. Securities as per Artcle III of the Constitution . - Sd. **S. A. Tiwari**, Treasurer.NUTA

time after making necessary amendments in the bye-laws of the constitution. The programme of Taluka Unit Elections was announced and notice to that effect was issued on page No.92 of 2000 NUTA Bulletin. In accordance with the same, all the Taluka Unit Elections were conducted peacefully on 20th November, 2000 at 4 p.m. simultaneously.

**(6)** You are all aware that after coming into force of the Maharashtra Universities Act, 1994, elections to the senate and various authorities were held in all the universities in the state. The organisation worked hard through their elected representatives to better the functioning of the universities. However, some of the political sections mounted pressure on the government to bring in amendments to the act seeking to weaken the strength of teachers' organisations.

**(7)** Succumbing to these pressures, the government hurriedly undertook the exercise of amending a less than 5 years old Act and instead of seeking mandate of the legislature, took recourse to issuance of an Ordinance to enforce these amendments. Without holding any discussion with the sections which might be affected by such amendments, the Government promulgated an ordinance No IX of 2000, dated 12th of May, 2000 introducing amendments to as many as 61 sections, subsections of the Maharashtra Universities Act, 1994 in the name of providing for adequate representation to the lower and neglected strata of the society including women and recognised reserved categories. In fact, the amendments apparently aimed at providing increased representation to the managements and allowing the Government to tighten its grip over the universities. The speed with which the government forced these amendments into the university functioning was not only amassing but also uncalled for.

The MFUCTO, however, reacted quickly and its team led by the then secretary Prof. Sambhajirao Jadhao sat for 3 days continuously to examine the ordinance and framed 28 amendments to the amendments proposed in the said ordinance along with an explanatory Note. The original Legislative Assembly Bill No. 44 Maharashtra Universities (Amendments) Bill, 2000 was tabled in the Assembly on the 27th of July, 2000 which was passed as it is amidst din consequent to peculiar political developments. The said Bill was then listed in the Business of the Legislative Council on the 1st of August, 2000. Based on the spadework done by MFUCTO, Prof. B.T.Deshmukh, P.M.Patil, V.U.Daigavane, Suresh Patil, and Nanasaheb Boraste had submitted 28 amendments to the Bill and the copies of the same were also distributed in the house. However, it could not come up for discussion on the same day. And thereafter it was never presented in the House by the Government in that session obviously because of the amendments proposed by our representatives and also due to the likelihood of the Bill being rejected.

Consequently, The Governor of Maharashtra had to promulgate the maharashtra Universities (Amendment and continuance) Ordinance, 2000 on the 25th of August, 2000 as the original Ordinance was to cease to operate on the 27th August, 2000 and the Government had nearly failed to get its ordinance converted into an Act of the State Legislature. The Government was further forced to held discussions with the Hon'ble members of the Legislative Council and consider their suggestions. Most of the amendments proposed by Prof. B.T.Deshmukh and his colleagues were admitted and fresh ordinance in the form of Maharashtra Universities (Amendment and continuance) (Amendment) ordinance, 2000 dated 9th of October, 2000 incorporating these proposals was promulgated.

At a later stage, the Bill was tabled in both the Houses and was approved with a few more amendments. Here, we place on record our sincere thanks to MFUCTO for its timely efforts and to Prof. B.T.Deshmukh and his colleagues for their vigilance and brilliant participation in the House but for which the amendments could not have come about in their present form.

**(8) UNIVERSITY SENATE ELECTIONS :**

During this year, elections to the Amravati University senate were held in accordance with the amended Act. And I am glad to inform this august gathering that the electorate showed overwhelming faith in the organisation and elected as many as 15 candidates unopposed to the senate and 7 to the Academic Council from different categories. Thus in Amravati University Senate Elections, most of the elected representatives were from the panel fielded by the organisation. I congratulate all of them and assure this house that they will work towards the fulfilment of the commitments made in the election manifesto.

**(9) ELECTION TO MFUCTO EXECUTIVE COMMITTEE :**

On 20th of August, 2000 election to Executive Committee of MFUCTO was held for the term of two years. I am glad to inform you that the following representatives of NUTA were elected unopposed to the body. They include Prof.A.W.Dhage and Dr.D.U.Pochhi (both Vice- Presidents), Prof.S.T.Sangle (Joint Secretary), Prof. B.T.Deshmukh, Prof.S.A.Tiwari, Prof.A.G.Somwanshi, Dr.E.H.Kathale, Dr.R.B.Golait, Prof.V.B.Dhone and Prof.M.D.Misal (Executive Committee Members). I congratulate them on your behalf on their election to this important body.

**(10) TASKS AHEAD :**

Though the revised scales of pay have been implemented in Maharashtra, the process of release of arrears on account of revision of pay-scales has been rather very slow. In most of the colleges where the arrears have been released, only 80% of the amount has been paid. To ensure full payment of arrears to the teachers will be an important task ahead of us. Secondly, the G.R. on revision of the pay-scales for the social work college teachers under the Department of Social Welfare has not yet been issued. The government will have to be moved for the immediate issuance of the G.R.

**(11) MEMBERSHIP OF NUTA:**

The NUTA membership has reached upto 4344 at the end of year. This year the increase in membership is 483.

(a) I am glad to inform you that NUTA Bulletin has completed its 25th year of its purposeful existence. This year we have circulated 120 pages of NUTA bulletin. If you go through the NUTA bulletin from first to the last page, you will find that NUTA Executive has tried to give up-to-date information to all its members about their problems and how the NUTA Executive particularly its President Prof. B.T.Deshmukh has focussed them at Maharashtra Govt. level through the Legislative Council.

(b) I am thankful to the press and their representatives both from Nagpur and Amravati areas, for wide coverage of the activities of the Association. This report shall not be complete unless I acknowledge the active cooperation and support of all the members of NUTA and also from non members i.e. University, College and Junior College Teachers in the activities of the Association and response given by them to the various calls given by NUTA from time to time.

Yours
(Dr.E.H.Kathale)
Secretary, NUTA.

# नेटसेटची परीक्षा उत्तीर्ण न केल्याचे निमित्त करुन महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांच्या वार्षिक वेतनवाढी रोखण्यात येणे.

*तिसरे अधिवेशन, २००० : गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २००० : महाराष्ट्र विधानपरिषद*

***सर्वश्री बी.टी.देशमुख,व्ही.यू.डायगव्हाणे,सुरेश पाटील,प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.***

**श्री.बी.टी.देशमुख** (अमरावती विभाग पदवीधर) : अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नेटसेटबाबतच्या उच्च शिक्षण विभागाच्या धोरणाविरुध्द ५ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २००० च्या दरम्यान हजारो शिक्षकांनी राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना पत्र आंदोलनाच्या मार्गाने एकसारखी पत्रे पाठवून करण्यात आलेले व होत असलेले अन्याय लक्षात आणून देणे, नेटसेटची परीक्षा उत्तीर्ण न केल्याचे निमित्त करुन बेकायदेशीरपणे शेकडो महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांच्या वार्षिक वेतनवाढी रोखण्याचा महाराष्ट्रामध्ये घडलेला व घडत असलेला प्रकार, २२ डिसेंबर, १९९५ च्या शासन निर्णयाने अनेक अन्याय्य अटी मागे घेणे, तथापि त्यांना तदर्थ नेमणूका देणे, वार्षिक वेतनवाढी न देणे व त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य न धरणे, ४ एप्रिल २००० च्या एका पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने "युजीसी रेग्युलेशन्स २०००" सर्व विद्यापीठांना पाठविणे त्या रेग्युलेशनच्या (क्र.एफ-३-१/२००० पीएस) परिच्छेद २ मध्ये "नेटसेट ही पात्रता परीक्षा सेवेत भरती होतांना आवश्यक असेल, त्या त्या वेळेच्या निवड समितीमार्फत ज्यांची निवड झालेली आहे अशा यापूर्वीच सेवेत असलेल्या शिक्षकांना नेटसेटची अट लागू असणार नाही " असे स्पष्टपणे नमूद करुनसुध्दा याबाबतचे अन्याय्य शासन निर्णय निरस्त न होणे, परिनियमामध्ये कोणताही बदल न करता उमेदवारीसाठी असलेल्या अटी विधिवतरित्या भरती झालेल्या शिक्षकांकरिता लागू करण्याच्या या प्रयत्नामुळे निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका"

**श्री.दिलीप वळसे पाटील** (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन**

नेट/सेटबाबतच्या उच्च शिक्षण विभागाच्या धोरणाविरुध्द राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी नोव्हेंबर,२००० मध्ये मा. मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात राज्यातील महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांवर शासकीय आदेशामुळे होत असलेल्या अन्यायाबाबत प्रामुख्याने तक्रार केली असून **विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४ एप्रिल, २००० च्या विनियमाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे.**

२. महाराष्ट्रातील विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकांकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेली वेतनश्रेणी **केंद्र शासनाच्या दिनांक १७ जून, ८७ व २२ जुलै, १९८८ च्या आदेशान्वये देण्यात आलेल्या सूचनांसह, शासनाने दि. १८/१/८९ रोजी महाराष्ट्र शासनाचे तत्कालिन मा. मुख्यमंत्री व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघामध्ये झालेल्या समझोत्यानुसार दि.२७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयाव्दारे विद्यापीठ अनुदान आयोगाची कंपोझिट स्किम जशीच्या तशी स्वीकारली आहे.** या आदेशाप्रमाणे विद्यापीठांनी २७ फेब्रुवारी,८९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेली वेतनश्रेणी व अधिव्याख्याता पदासाठी असलेली पात्रता परीक्षेची अट अमरावती विद्यापीठाने त्यांच्या परिनियमामध्ये व इतर विद्यापीठांनी त्यांच्या निदेशामध्ये अंतर्भूत केली आहे.

३. या आदेशात अधिव्याख्याता पदासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने घातलेल्या किमान पात्रतेच्या अटीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोग वेळोवेळी राज्य शासनाला जसे मार्गदर्शन करेल त्या मार्गदर्शनानुसार राज्यशासन त्याची अंमलबजावणी करीत असते. केंद्र शासनाने सुचविलेल्या चौथ्या वेतन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक २७ फेब्रुवारी, १९८९ रोजी निर्गमित केला. त्यानुसार अधिव्याख्याता व तत्सम पदांवरील नियुक्त्यांकरिता खालील पात्रता आवश्यक आहे.

(अ) संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी ५५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे.

(ब) चांगला शैक्षणिक अहवाल असणे.

(क) विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेली पात्रता परीक्षा (Comprehensive Test devised by U.G.C.) उत्तीर्ण असणे आवश्यक असेल.

४. दिनांक २७/२/८९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ मध्ये वर क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या पात्रता परीक्षेबद्दल खालील बाब देण्यात आलेली आहे.

Only those candidates who, besides fulfuling the minimum qualifications prescribed for the post of a Lecturer, Librarian and Physical Education staff, have qualified in a comprehensive test to be conducted for the purpose, will be eligible for appointment. The detailed scheme for conducting the test including its design, the agencies to be employed in the conduct of the test, content, administration etc. will be worked out by the University Grants Commission keeping in view the requirement of the media of instructions followed by the different Universities and Colleges and other relevant considerations. For purposes of recruitment to the post of Lecturer/Librarian/Director/Instructor of Physical Education in Colleges and Principals of Colleges, the composition of the Selection Committee has already been laid down in Appendix accompanying Government Resolution, Education and Youth Services Department No.USG 1177/129387/XXXII (Cell), dated 25th October, 1977, The same precedure should continue to be in operation till it is suitably replaced by the University Grants Commission. In order to enable all the members of the Selection Committee to attend the meeting a minimum notice of fifteen days from the date of issue of letter if necessary.

Universities are requested to evolve, if they have not evolved, a reasonable quantified system of evaluation for the purpose of selection to the post of Lecturer/Assitant Librarian/Deputy Librarian /Director/Deputy Director/ Assistant Director of Physical Education, Principal, till the details of the comprehensive test is received from the University Grants Commission. Such evaluation system should be followed by the aforesaid Selection Committees to ensure minimum standards.

Similarly selection of Teachers/Assistant Librarians/ Deputy Librarian/Director/Deputy Director/Assistant

Director of Physical Education in the Universities, shall continue to be made in accordance with the provisions in the respective University Acts and the Statutes made thereunder, till University Grants Commission Communicates aforesaid procedure.

५. सदर आदेशामध्ये, विद्यापीठ अनुदान आयोग अधिव्याख्याता पदासाठी आवश्यक असणाऱ्या पात्रता परीक्षेची (Comprehensive Test) जोपर्यंत व्यवस्था करीत नाही तोपर्यंत सुरु असलेली निवड प्रक्रिया चालू राहील, असा उल्लेख केलेला आहे. (The same procedure should continue to be in operation till it is suitably replaced by the comprehensive test to be prescribed by the University Grants Commission.

६. सन १९७७ मधील निवड समित्या खालीलप्रमाणे आहेत :-

College Teachers - Selection Committee

(a) Chairman, Governing Body of the College or his nominee;

(b) a nominee of the Vice-Chancellor,

(c) One expert to be nominated by the University,

(d) One nominee of the Director of Education (Higher Education);

(e) Principal of the College, and

(f) Head of the Department concerned of the College.

७. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक १९/९/९१ च्या अधिसूचनेनुसार पात्रता परीक्षा (नेट परीक्षा) ही १९९१ पासून सुरु केली व यानंतर सर्व अधिव्याख्यात्यांना ही परीक्षा अनिवार्य असेल, असे स्पष्ट केले आहे. परंतु १९९१ पूर्वी लागलेल्या अधिव्याख्यात्यांना वरील पात्रता परीक्षेची अट लागू राहणार नाही. असे विद्यापीठ अनुदान आयोगाने शासनाला कळविले.

८. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २१ जून १९९५ च्या अधिसूचनेनुसार ज्या अधिव्याख्यात्यांनी ३१ डिसेंबर, ९३ पूर्वी एम.फिल. परीक्षा उत्तीर्ण केली आहे वा ज्यांनी दिनांक ३१/१२/९३ पूर्वी पी.एच.डी.प्रबंध सादर केला आहे. त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेली पात्रता परीक्षा (नेट) उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली आहे व शासनाने दिनांक २२/१२/९५ च्या शासन निर्णयाव्दारे सर्व विद्यापीठे/महाविद्यालयांना त्यानुसार आदेश निर्गमित केले आहेत. सन १९९३-९४ च्या सुमारास शासनाच्या असे निर्दशनास आले की, विद्यापीठ अनुदान आयोगाने अनिवार्य केलेली नेट परीक्षा बहुतांश शिक्षक वर्गाने एकतर उत्तीर्ण केली नाही वा त्यास बसले नाहीत किंवा त्या परीक्षेचे गांभीर्य त्यांनी पुरेशा प्रमाणात लक्षात न घेता या परीक्षेस बसण्याचे टाळलेले आहे. राज्य शासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाची कंपोझिट स्किम जशीच्या तशी स्वीकारली असल्यामुळे त्यानुसार संघटनेशी करारही केला असल्यामुळे दिनांक २ फेब्रुवारी, ९४ रोजी शासन पत्रान्वये महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या कुलसचिवांना नेट परीक्षेचे महत्व विशद करुन ही परीक्षा उत्तीर्ण होणे विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकांना बंधनकारक आहे, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यानुसार जे शिक्षक ही परीक्षा ३१ मार्च ९४ पर्यंत उत्तीर्ण होतील त्यांच्या सेवा या नियमित स्वरुपात धरल्या जातील, असे नमूद करण्यात आले आहे. तद्‌नंतर दिनांक ७ मार्च,९४ च्या शासन पत्रान्वये पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्याची मुदत ३१ मार्च ९५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. दिनांक २८ एप्रिल, ९४ च्या शासन पत्रान्वये ही मुदत ३१ मार्च ९६ पर्यंत वाढविण्यात आली व दिनांक ३१ मार्च ९६ पर्यंत जे नेट परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत. त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात येईल. असे आदेश त्यात नमूद करण्यात आले आहेत.

९. आंदोलनकर्त्यांच्या निवेदनात, "१९७७ च्या शासन निर्णयाने विहित विद्यमान निवड प्रक्रियेला suitably replaced असा जो शब्दप्रयोग वापरला आहे, त्यानुसार जोपर्यंत या परीक्षेची पर्यायी व्यवस्था पूर्ण होत नाही, तोपर्यंत निवड मंडळाची निवड प्रक्रिया ही अंतिम राहील व या माध्यमातून आलेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा २ वर्षानंतर कायम होतील, ही व्यवस्था पूर्णपणे कायदेशीर आहे. असे विधीमंडळात लोकप्रतिनिधींनी सांगितल्यानंतरही त्यानुसार शासनाने विचार न करता दिनांक २८ एप्रिल, ९४ च्या पत्रान्वये वाढविलेली मुदत मागे घेण्यात आलेली नाही, असे चुकीचे धोरण विभागाने घेतलेले आहे. या धोरणामुळे आज महाराष्ट्रामध्ये शिक्षकांच्या नियुक्त्या नियमित स्वरुपात झालेल्या नसल्यामुळे तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे, असे नमूद केले आहे.

१०. दिनांक २२/१२/९५ च्या शासन निर्णयात विहित शैक्षणिक अर्हताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे ज्या उमेदवारांची नियुक्ती ही तत्कालिन सेवा प्रवेश नियमांच्या अधिनस्थ झालेली असेल, अशा नियुक्त्या या तदर्थ स्वरुपात समजण्यात याव्यात, असे ठरविण्यात आले व या उमेदवारांना ते नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंतच्या कालावधीतील वेतनवाढ देण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला. मात्र त्यांना सेवेतून कमी करण्यात येऊ नये. अशी सहानुभूतीपूर्वक भूमिका घेण्यात आली. तसेच जे उमेदवार नेट/सेट ची परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांना ती उत्तीर्ण होईपर्यंत वरिष्ठ व निवड श्रेणी देण्यात येऊ नये. असाही निर्णय घेण्यात आला. वस्तुतः विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १९/९/१९९१ रोजी काढलेल्या अधिसूचनेत अनर्हताधारक उमेदवारांच्या नियुक्त्या शिक्षकीय पदावर करु नयेत, असे स्पष्ट निदेश दिले असूनही, जे अनर्हताधारक अधिव्याख्याता सेवेत आले, त्यांच्याबद्दल सहानुभूतीपूर्वक धोरण म्हणून त्यांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी संधी उपलब्ध करुन देण्यासाठी नेट परीक्षेची मुदत वाढविण्यात आली आहे. त्यांची सेवा या सेवाज्येष्ठतेत धरण्यात येऊ नये, अशा प्रकारचे सर्वसाधारण स्वरुपाचे निर्बंध त्यावेळी घालण्यात आले.

११. निवेदनकर्त्यांनी मा. उच्च न्यायालयाच्या दिल्ली खंडपीठाने दिनांक १२ मे १९९३ रोजी नेट/सेटची पात्रता परीक्षा बंधनकारक आहे असा निर्णय दिला. त्यासोबतच "This will however not apply to the appointments already made." याकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. सदर आदेशामध्ये उच्च न्यायालय, दिल्ली खंडपीठाचे दिनांक १३ मे, ९३ पूर्वी ज्या अधिव्याख्यात्यांची निवड झालेली आहे (योग्य निवड समित्यांव्दारे) त्यांना या पात्रता परीक्षेमधून वगळण्यात यावे. असा निर्णय दिलेला आहे. यानंतर सदर याचिकेबाबत सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या

## नेटसेट परीक्षेच्या स्वरूपाविषयी अनुदान आयोगाकडे राज्य शासनाने केलेली विचारणा

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २०००*

***गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०००***

**(१७) * ९३५२. सर्वश्री सुरेश पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, प.म.पाटील, वसंत काळे :** तारांकित प्रश्न क्रमांक ७६४६ ला दिनांक १८ जुलै, २००० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय-

(१) ४ एप्रिल, २००० च्या एक पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने "युजीसी रेग्युलेशन्स २०००" सर्व विद्यापीठांना पाठविले असून त्या रेग्युलेशनच्या (क्र.एफ-३-१/२००० पीएस) परिच्छेद २ मध्ये "नेट सेट ही पात्रता परीक्षा सेवेत भरती होताना आवश्यक असेल. त्या त्या वेळेच्या पात्रतेनुसार त्या त्या वेळेच्या निवडसमिती मार्फत ज्यांची निवड झालेली आहे अशा यापुर्वीच सेवेत असलेल्या शिक्षकांना नेटसेटची अट लागू राहणार नाही." असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे, ही गोष्ट काही विधानपरिषद सदस्यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी किंवा त्यादरम्यान झालेल्या एका बैठकीत मा.उच्च शिक्षण मंत्री, मा.उच्च शिक्षण सचिव यांच्या लक्षात आणून दिली, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने काय कारवाई केलेली आहे किंवा करण्याचे योजिले आहे;

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय. केंद्र शासनाने राज्य शासनास दि.११.५.१९९९ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.२४.१२.१९९८ च्या अधिसूचनेतील परिच्छेद ३.३.० कडे शासनाचे लक्ष वेधले असून त्यानुसार अधिव्याख्याता पदाकरिता नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण असणे ही आवश्यक अट असल्याचे स्पष्ट केले आहे.

(२) शासन निर्णय, दिनांक १३ जून, २००० मध्ये ही तरतूद अंतर्भूत करण्यात आली असून त्यानुसार संबंधित विद्यापीठांनी कार्यवाही करावयाची आहे.

(३) वरील बाब -२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रश्न उद्‌भवत नाही.

विशेष अनुज्ञा याचिकेमध्ये दिनांक १५ एप्रिल,९४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने "That order will continue to operate till the final disposal of this appeal in the Supreme Court" असे आदेश राजसिंग व इतर, दिल्ली विरुध्द यु.जी.सी. व इतर या याचिकेसंबंधात दिलेले आहेत.

१२. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २४/१२/९८ रोजी निर्गमीत केलेल्या अधिसूचनेनुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकीय पदांवरील नियुक्त्या करण्याकरिता किमान शैक्षणिक अर्हता व शिक्षणाचा दर्जा कायम राखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना या संदर्भात पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. हे आदेश विचारात घेऊन दिनांक ११/१२/९९ च्या आदेशान्वये राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करणे, शिक्षकीय पदावरील नियुक्त्यांकरिता किमान शैक्षणिक अर्हता व उच्च शिक्षणाचा दर्जा कायम राखण्यासाठी करावयाच्या इतर उपाययोजना याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

१३. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४ एप्रिल, २००० च्या पत्रान्वये पाठविलेल्या अधिसूचनेव्दारे विद्यापीठीय व महाविद्यालयीन अधिव्याख्याते, प्रपाठक व प्राध्यापक या पदांकरिता असलेली किमान शैक्षणिक अर्हता व करिअर ॲडव्हान्समेंट योजना याबाबतचे विनियम, २००० तयार करुन सर्व विद्यापीठांना व राज्य सरकारांना पाठविले आहेत. हे विनियम राज्य शासनाने दिनांक १३ जून,२००० च्या आदेशान्वये राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू केले आहेत.

१४. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४ एप्रिल २००० अन्वये पाठविलेल्या अधिसूचनेची सुरुवात "In supersession of UGC Regulation No. F.1-11/87 (CPP-II) dated 19th September, 1991 and Notification No. F.3-1/94(PS) dated 24th December, 1998, the UGC has made the Regulations for minimum qualifications required for the appointment and career advancement of teachers in universities and institutions affiliated to it ." अशी केलेली आहे. याचा अर्थ दिनांक १९ सप्टेंबर,१९९१ व तद्नंतर दिनांक २४ डिसेंबर, ९८ अन्वये निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतुदी निष्प्रभावित करुन सुधारित आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या आदेशांमध्ये शिक्षकांकरिता पात्रतेच्या संदर्भात पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

" No person shall be appointed to a teaching post in university or in any of the institutions including constituent or affiliated colleges recognised under clause (f) of section 2 of the University Grants Commission Act,1956 or in an institution deemed to be university under Section 3 of the said Act in a subject if he/she does not fulfil the requirements as to the qualifications for the appropriate subjects as provided in the Annexure."

अशी मूळ तरतूद आहे व या मूळ तरतुदीला खालीलप्रमाणे परंतुक जोडलेले आहे.

" Provided that any relaxation in the prescribed qualifications can only be made by the University Grants Commission in a particular subject in which NET is not being conducted or enough number of candidates are not available with NET qualifications for a specified period only. (This relaxation, if allowed, would be given based on sound justification and would apply to affected Universities for that particular subject for the specified period. No individual applications would be entertained.)

Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidate having had the then requisite minimum qualification as were existing at that time through duly constituted Selection Committes for making appointments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations."

१५. जुनी प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या अधिसूचनेव्दारे पुनःस्थापित (Replace) करण्यात आली असून ती शासन निर्णय दिनांक २३/१०/९२ व २७/११/९२ अन्वये सर्व विद्यापीठांना कळविण्यात आली आहे. त्यामुळे १९९१ नंतर सेवेत आलेले सर्व अनर्हताधारक अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या नियमित स्वरुपात नसल्याने त्यांना दिनांक ४ एप्रिल, २००० चे विनिमय लागू होत नाहीत. त्यामुळे या तदर्थ अधिव्याख्यात्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

१६. दिनांक १४ जुलै, १९९४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषी विद्यापीठातील व महाविद्यालयातील अधिव्याख्यांताकरिता नेट परीक्षा ही प्रादेशिक भाषेतून घेण्याबाबतचा प्रश्न विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने सोडविण्यात आला असून त्यायोगे पुणे विद्यापीठाने राज्यस्तरीय पात्रता परीक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संमतीने व त्यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार घेण्यात याव्यात, असे आदेश देण्यात आले. पुणे विद्यापीठामार्फत त्यानुसार १९९५ पासून सेट परीक्षा घेण्यात येतात. सन १९९१ पासून आतापर्यंत विद्यापीठ अनुदान आयोग व पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षा व राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (नेट/सेट) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची संख्या सुमारे ७,४०० इतकी आहे.

१७. वरील वस्तुस्थितीवरुन राज्यात पुरेशा प्रमाणात अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत असल्यामुळे सन १९९१ नंतर सेवेत आलेल्या अनर्हताधारक अधिव्याख्यात्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महोदय, या ठिकाणी १७ परिच्छेदांचे निवेदन वितरीत करण्यात आले आहे. त्यामधील १४ परिच्छेद हे या शिक्षकांना न्याय देणारे आहेत. शेवटी निर्णय मात्र विरोधात दिला आहे. शेवटच्या ३ परिच्छेदामध्ये अनेक असंबध्द गोष्टी आहेत आणि निवेदनातील निर्णय शिक्षकांच्या विरुध्द आहे. पहिल्या १४ परिच्छेदामध्ये त्यांच्या विरोधात काही नाही. मग आता माझे म्हणणे असे आहे की, मंत्री महोदयांना सतत चुकीची माहिती देण्याचे काम हे अधिकारी करतात. मी मुद्दाम हा शब्द वापरतो. निवेदन मंत्री

## समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करणे बाबत मा.उच्च न्यायालयाचा निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २०००*

***सोमवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०००***

(११) * ९११८. **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प.म.पाटील** : सन्माननीय समाजकल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय-

(१) समाजकार्य महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था लागू करण्यात येणार नाही. हा शासनाचा ८.७.९८ रोजी घेतलेला निर्णय नमूद असलेले संचालक, समाजकल्याण विभाग यांचे ३१.३.९९ चे आदेश रद्दबातल ठरविणारा निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन नंबर ५४६७ ऑफ १९९९ या प्रकरणात दिनांक १८ जानेवारी रोजी किंवा त्या दरम्यान दिला, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त निवाड्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने शासनाला दिलेल्या आदेशाचे निश्चित स्वरुप काय आहे;

(३) उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी काय उपाययोजना करण्यात आलेली आहे;

(४) उपाययोजना केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.जयवंतराव आवळे** : (१) होय.

(२) समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने विचार करावा असे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १८.१२.२००० रोजी दिले आहेत.

(३) सदर निवृत्ती वेतन योजना टप्प्याटप्प्याने कशा प्रकारे लागू करता येईल. याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

*****

महोदयांचे असते. जबाबदारी त्यांची ही असते. दिनांक २५ जुलै, २००० ला निवेदन केलेले होते त्यातले शेवटचे वाक्य मी मुद्दाम वाचतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "वरील तरतूदी लक्षात घेता १९.९.९१ च्या अधिसूचनेनुसार शिक्षकाकरिता नेटसेट परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक अट असल्याने सेवेत असलेले बिगर अर्हताधारक अधिव्याख्याते नेटसेट परीक्षा उत्तीर्ण नसल्याने या शिक्षकांना त्यांच्या सेवा नियमित करणे, त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी देणे याचा लाभ देता येणार नाही." अध्यक्ष महोदय, हे १९९१ चे नोटीफिकेशन युजीसीने सुपरसिड केलेले आहे. मंत्रीमहोदयांना मी काल सांगितले. आज ते वाक्य नाही म्हणून मी त्यावर आता बोलणार नाही. माझे म्हणणे एकच आहे. पहिल्याच परिच्छेदामध्ये आपण मान्य केलेले आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी, शिक्षण मंत्री तेथे होते, वित्त सचिव तेथे होते. चार-पाच दिवस वाटाघाटी होऊन १८ जानेवारी ८९ ला असे ठरले की, केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे हे करायचे. मग केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे करण्याचे ठरल्यानंतर त्यात नसलेले अनेक मसाले घालणारे आमचे हे अधिकारी आहेत. पहिल्यांदा हूकूम काढला "३१ मार्च १९९४ पर्यंत नेटसेट यांनी केले नाही तर त्यांना काढून टाका." सभागृहामध्ये चर्चा झाली. हूकूम मागे घेतला. दुसरा हुकूम काढला "३१ मार्च १९९५ पर्यंत नेटसेट केले नाही तर यांना काढून टाका." सभागृहात चर्चा झाल्यानंतर तो दुसरा हुकूम मागे घेतला. त्यानंतर "३१ मार्च १९९६ पर्यंत जर नेट सेटची परीक्षा उत्तीर्ण केली नाही तर त्यांना काढून टाकावे." असा तिसरा हुकूम काढला. त्याबाबतीत येथे चर्चा झाली. तो हुकूम सुध्दा मागे घेतला. "३१ मार्च १९९६ पर्यंत ही परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट शासन मागे घेत आहे" असा निर्णय काढण्यात आला. २२ डिसेंबर १९९५ रोजी शासनाने जो शासन निर्णय काढला होता, त्यामध्ये सुध्दा अनेक वाईट मसाले टाकण्यात आले होते. मी सभागृहात म्हणालो होतो की हे "मंत्रालयातील लोकल प्रॉडक्ट" आहे. यु.जी.सी.चे त्यामध्ये काहीही म्हणणे नाही. त्यावेळी काही अटी काढून टाकल्या होत्या आणि काही अटी शिल्लक राहिल्या आहेत. तेव्हा काय काढून टाकण्यात आले होते ते सांगतो आणि काय काढायचे राहिले आहे ते सुध्दा सांगतो. यांना इनक्रिमेन्ट देऊ नका असे यु.जी.सी.चे म्हणणे होते काय ? यु.जी.सी.चे असे म्हणणे कोठे होते? तरी सुध्दा ती अट टाकण्यात आली होती. सभागृहात चर्चा झाल्यानंतर ती अट काढून टाकण्यात आली. त्यांना प्लेसमेंट देण्यास मनाई करणारी शासन निर्णयातील अट अजूनही मागे घेतलेली नाही. या बाबतीत माझे स्पष्ट म्हणणे असे आहे की दिनांक २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयामध्ये या चार गोष्टी टाकल्या होत्या त्याला केन्द्र सरकारच्या सूचनांचा कोणताही आधार नव्हता ही गोष्ट खरी आहे काय ? हे एक व खरी असेल तर त्यातील दोन अटी आपण मागे घेतल्या आहेत तेव्हा उरलेल्या दोन केव्हा मागे घेणार आहात.

**श्री.दिलीप वळसे - पाटील :** सभापती महोदय, ज्यावेळी या राज्यामध्ये किंवा देशामध्ये चौथा वेतन आयोग लागू केला त्यावेळी दिनांक २७-२-१९८९ ला चौथ्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी देत असतांना यु.जी.सी.ने हे मान्य केले होते किंवा असे सूचित केले होते आणि राज्य सरकारने सुध्दा चौथ्या वेतन आयोगाच्या संदर्भात जी.आर.इश्यू करीत असतांना त्याचा समावेश यामध्ये केला होता. यु.जी.सी. या संदर्भात जी राष्ट्रीय पात्रता ठरविल किंवा जे क्वालिफिकेशन ठरविल ती त्या ठिकाणी आपण मान्य केली पाहिजे आणि त्यानुसार आपण चौथा वेतन आयोग लागू केला होता. चौथ्या वेतन आयोगाप्रमाणे ज्यावेळी वेतनश्रेणी लागू केल्या तेव्हा यु.जी.सी.ने १९९१ साली नेटची परीक्षा आवश्यक आहे अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेतला. त्यावेळी राज्यामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात काही अडचणी आपल्या सर्वांच्या समोर जरुर उभ्या राहिल्या होत्या. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न झाला. यु.जी.सी.ने दिलेल्या गाईडलाईन्स स्वीकारल्यानंतर त्या गाईडलाईन्सप्रमाणे सर्वराज्यातील विद्यापीठांना कळविल्यानंतर जर राज्यातील विद्यापीठांनी रिक्रुटमेंट करीत असतांना त्यांनी यु.जी.सी.च्या गाईडलाईन्स स्वीकारल्या नाहीत तर कदाचित या शिक्षकांना आम्हाला सेवेमध्ये ठेवता येणार नाही. त्यामध्ये वेतनश्रेणी देता येणार नाही. प्रमोशन्स देता येणार नाही अशा प्रकारच्या काही अटी त्यामध्ये होत्या. परंतु या सर्व अटी घातल्यानंतर ज्या ज्या वेळी सभागृहामध्ये चर्चा झाली. संघटनांच्याप्रतिनिधी बरोबर चर्चा झाली त्यावेळी फार तीव्रतेने हे सर्व प्रश्न मांडले गेले होते.

१९९१ साली नेटची अट लागू करीत आहात आणि ही अट लागू केल्यानंतर परीक्षेची व्यवस्था या राज्यामध्ये करता आली नाही म्हणून ही अट लागू करु नका असे त्यावेळी सांगण्यात आले होते. ज्यावेळी नेटच्या परीक्षेची व्यवस्था करण्यात आली त्यावेळी आमच्या भाषेमध्ये आम्हाला परीक्षा देण्याची व्यवस्था उपलब्ध नाही त्यामुळे ही अट लावू नका असे सांगण्यात आले होते. राज्य सरकारने १९९५ साली नेटच्या बरोबर मातृभाषेमध्ये परीक्षेला बसण्यासाठी सेटची परीक्षा सुरु केली त्यावेळी या सर्व शिक्षकांनी किमान १९९५ नंतर तरी नेट किंवा सेटची परीक्षा पास होऊन आपली जी पात्रता होती ती पात्रता मिळविणे आवश्यक होते. त्यासंबंधी सातत्याने प्रयत्न करुन देखील ज्यावेळी या सर्व प्राध्यापकांनी यापैकी कोठलीही पात्रता धारण केलेली नाही अशा प्राध्यापकांना सूट देण्याच्या संदर्भात विचार करता येणार नाही अशी राज्य सरकारची भूमिका होती. राज्यामधील शिक्षणाचा गुणात्मक दर्जा राखण्याच्या दृष्टीने आपल्याला यामध्ये काही निर्णय घेणे आवश्यक आहे. यु.जी.सी.ने काही गाईडलाईन्स ठरविल्या आहेत. त्याप्रमाणे सर्व विद्यापीठांना आपण आदेश दिले. काही विद्यापीठानी स्टॅट्युटमध्ये तशी तरतूद केली होती. काही विद्यापीठांनी प्राचार्यांना, कॉलेजेसना, संस्थांना डायरेक्टीव्हज देऊन कळविले होते. एवढे कळविल्यानंतरसुध्दा या संदर्भात विनंती करण्यात येते की, या प्राध्यापकांना नेट-सेटच्या परीक्षेतून सूट देण्यात यावी ही बाब शासनाच्या विचाराधीन असून अजूनही शासनाला विचार करण्यासाठी वेळ लागणार आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही. मी सरळ विचारले होते की, राज्याचे मा. मुख्यमंत्री यांनी तसेच मुख्य सचिवांनी बसून जे ॲग्रीमेंट केले त्यामध्ये या अटी कोठेही नाहीत. या अटींना युजीसीचा कोठेही आधार नाही. मी गेली सात वर्षे यांना या सभागृहात सांगतो आहे की, हे तुम्ही उद्या बंधनकारक करायचे असेल तर ते आज लागू करा म्हणून. पण सरकारने ते केले नाही. आता युजीसीने तुम्हाला कळविले आहे आणि या निवेदनामध्ये आपण ते मान्य केलेले आहे. युजीसीचे आजही म्हणणे आहे की, नेटसेट परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. त्यासाठी तुम्ही तुमचे स्टॅट्युट अमेंड करा. पण त्यावेळीसुध्दा सरकारने याबाबत काही केले नाही आता तुम्ही, मा. मंत्रिमहोदय श्री. वळसेपाटील आल्यानंतर डिसेंबर १९९९ मध्ये तुम्ही ते केले आहे. त्यापूर्वी कोणीही ते सक्तीचे केले नाही. आपण म्हणता अगोदरच हे केले तर मग हे ८ हजार लोक काय फाटकावरुन उडी मारुन सेवेमध्ये आले काय? अध्यक्ष महाराज, आपला जो विद्यापीठ कायदा आहे त्यामध्येच सेवाशर्ती स्टॅट्युटने केल्या पाहिजे असे नमूद आहे. स्टॅट्यूटमध्ये बदल करा हे केंद्र सरकार आणि युजीसी तुम्हाला वारंवार कळवित होते पण तुम्ही ते केले नाही. युजीसीच्या अध्यक्षांनी नावानिशी महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणमंत्र्यांना पत्र लिहून कळविले आहे की, तुमचे सचिव १९९२ च्या ऑल इंडीया कॉन्फरन्सला हजर होते आणि त्यावेळीच हे ठरले होते की, तुम्ही यासाठी स्टॅट्यूट अमेंड केले पाहिजे, पण तुम्ही ते अजूनही केले नाही. यात म्हटले आहे की, ... ३ जुन १९९२ चे हे पत्र आहे. यु.जी.सी. चे अध्यक्ष श्री जी.राम. रेड्डी यांनी अनंतराव थोपटे उच्च शिक्षणमंत्री यांना लिहिलेले त्यात ते म्हणतात :-

"I am writing this letter to seek your intervention in the matter for ensuring that the mechanism of UGC-NET state-NET becomes operational and is prescribed in University's Statutes/Recruitment rules for Government Colleges at the earliest." हे युजीसीने यांना कळविले आहे, पण ते ऐकत नाहीत... त्यावेळी श्री.वळसे पाटील नव्हते, श्री थोपटे साहेब होते. त्यांनी हे काहीही केले नाही. नंतर मग १९९९ मध्ये हे आपण अमेंड केले. अर्थातच त्या अगोदरच्या लोकांना हे लागू होत नाही. आता युजीसीने तुम्हाला कळविले. एप्रिल २००० मध्ये युजीसीने रेग्युलेशन काढले. आपल्या निवेदनात तुम्ही कबूल केले आहे. ते काय होते ? निवेदनाच्या पृष्ठ ७ वरील परिच्छेद १४ मध्ये म्हटले आहे की, provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidate having had the then requisite minimum qualifications as were existing at that time through duly constituted Selection committees for making appointments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations." हे रेग्युलेशन अंमलात येण्यापूर्वी जे सेवेत होते .. हे एप्रिल, २००० चे रेग्युलेशन आहे. परंतु त्यापूर्वी जे सेवेत भरती झालेले आहेत जे निवड समितीमार्फत, योग्य पध्दतीने सेवेत आलेले आहेत त्यांच्याबाबतीत आपली भूमिका काय आहे? देन टाईम रिक्विझिट मिनिमम क्वालिफिकेशन आता आपल्या स्टॅट्युटमध्ये असले तरी त्यापूर्वीच्या लोकांना ते लागू होणार नाही. तेव्हा माझे म्हणणे असे आहे की, हे जे ८ ते १० हजार शिक्षक आहेत, ते काय बेकायदा आत घुसले काय? ते रितसर निवडप्रक्रिया पूर्ण करुन सेवेत आलेले आहेत ना? तुम्ही स्टॅट्यूट अमेंड आता केला आहे, तेव्हा युजीसीने आपल्याला जे स्पष्टपणे कळविले आहे त्यानुसार कारवाई केली जाईल काय? अध्यक्ष महाराज, याठिकाणी पृष्ठ ११ मध्ये हायकोर्टाने दिलेला निर्णय आहे... त्यावर सुप्रीम कोर्टाचे शिक्कामोर्तब आहे..

"That order will continue to operate till the final disposal of this appeal in the Supreme Court."

हजारो शिक्षकांनी निवेदने पाठवून मुख्यमंत्र्यांना हे कळविले आहे. तेही आपण या निवेदनात दिले आहे. आपण यात कबूल केले आहे की, हायकोर्टाचा हा निर्णय आहे. तेव्हा युजीसीने सांगितले ते असे की "देन टाईम रिक्विझिट मिनिमम क्वालिफिकेशन .. ज्यांना आहे त्यांना नेटसेट लागू नाही", तर त्याप्रमाणे आदेश काढले जातील काय?

**श्री. दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबद्दल सांगतो. ज्यावेळी आपण चौथ्या वेतन आयोगाप्रमाणे नियम लागू केला त्यावेळी २७.२.८९ ला राज्य सरकारने एक जी.आर. काढला व त्या माध्यमातून सर्व विद्यापीठांना कळविण्यात आला. ज्यावेळी नवीन निकषाबाबत यु.जी.सी. चे धोरण सर्व विद्यापीठांना कळविण्यात आले त्यावेळी सर्व विद्यापीठांनी त्याप्रमाणे आपल्या स्टॅट्युटमध्ये बदल करण्याची जबाबदारी होती. त्या मधल्या काळात अमरावती विद्यापीठाने आपल्या स्टॅट्युटमध्ये बदल केले. परंतु बाकीच्या विद्यापीठांनी स्टॅट्युटमध्ये बदल करण्याऐवजी बाय ऑर्डर बाकीच्या सर्व संस्थांना या संदर्भात नवीन नेटचे क्वालिफिकेशन काय आहे हे कळविले. सर्व महाविद्यालयांना कळविण्याचे काम त्यांनी केले. महाराष्ट्र विद्यापीठ सुधारणा कायद्याच्या सेक्शन १४ (८) कडे मी आपले लक्ष वेधतो. ज्यावेळी तातडीची परिस्थिती असेल त्यावेळी कुलगुरु आपल्या अधिकारात महाविद्यालयांना डायरेक्टिव्ह देवू शकतात. त्याप्रमाणे त्यांनी डायरेक्टिव्ह दिल्यानंतर व त्या मॅनेजमेंट कौन्सिलकडे जावून मंजूर करुन घ्याव्या लागतात. याठिकाणी ७४ च्या कायद्यातील सेक्शन १२ (६) (बी) मध्ये तरतूद होती ती ९४ च्या कायद्यात सेक्शन १४ (८) मध्ये आहे. माननीय सदस्यांचे म्हणणे असे की, यामध्ये १९९१ ची पात्रता आहे त्याबाबत राज्य सरकारने १९९२ मध्ये कळविल्याप्रमाणे स्टॅट्युटमध्ये सुधारणा केली नाही. म्हणून त्यावेळचे रिक्विझिट क्वालिफिकेशन हे त्या काळातील ड्युली कॉन्स्टिट्युटेड कमिटीने केली असेल त्या रिक्विझिट क्वॉलिफिकेशनच्या संदर्भात या ठिकाणी थोडासा वादाचा मुद्दा निर्माण झाला. त्यामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये विभागाचे स्पष्ट मत झाले नाही. माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला की, एप्रिल २००० ला यु.जी.सी. ने सर्व विद्यापीठांना डायरेक्टिव्ह दिल्या, व सरकारलाही पाठविल्या. त्यामध्ये जो प्रोवायजो घातला त्या संदर्भात या लक्षवेधीच्या उत्तरामध्ये स्पष्टपणे उत्तर दिले आहे. आता प्रश्न असा आहे की, १९९२ मध्ये राज्य सरकारने बाय ऑर्डर विद्यापीठांना कळविले होते की, तुम्ही ९१ च्या क्वालिफिकेशनचा तुमच्या स्टॅट्युटमध्ये समावेश करा. त्यावेळी त्या विद्यापीठांनी त्या संदर्भात कारवाई कां केली नाही? किंवा त्यामध्ये दुसऱ्या प्रोवायजोमध्ये त्या संदर्भात आपल्याला संधी उपलब्ध होती, त्या संधीप्रमाणे विद्यापीठाने कारवाई करण्याची आवश्यकता होती. अशा रितीने विद्यापीठांनी कारवाई करण्याची संधी असताना देखील त्यामध्ये एखाद्या विषयाकरिता नेटची पात्रता प्राप्त केलेले प्राध्यापक मिळत नसतील तर व त्यासंदर्भात विशेष सवलत पाहिजे असेल तर त्याबाबत विद्यापीठांनी यु.जी.सी. कडे विद्यापीठांचा एकत्रित प्रस्ताव पाठविला तर त्याबाबत सवलत देण्याची भूमिका या प्रोवायजोमध्ये घातलेली आहे. विद्यापीठांनी यासंदर्भात कारवाई पूर्ण केली नाही व राज्य सरकारने आपली जबाबदारी पूर्णपणे पार पाडली आहे. अशा वेळी या संदर्भात ४ एप्रिल २००० चे नोटिफिकेशन यु.जी.सी. ने पाठविले आहे त्या नोटिफिकेशनमधील प्रोवायजो ज्या विषयाच्या संदर्भात मा. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला त्यावर अधिक विचार करण्याची राज्य सरकारला आवश्यकता आहे. आज आपण म्हणता त्याप्रमाणे तो प्रोवायजो वाचून दाखविला. त्यातील अर्थाप्रमाणे आम्हाला आपल्या भूमिकेशी सहमत व्हावे लागेल. परंतु त्यामध्ये ९१ रिक्विझिट क्वॉलिफिकेशन काय आहे ? ९१ चे रिक्विझिट क्वॉलिफिकेशन ड्युली कॉन्स्टिट्युटेड कमिटीच्या मार्फत कोणती आहे? आज बऱ्याचशा महाविद्यालयाकडे असे झाले आहे की, नेट सेटचे विद्यार्थी आले असतांना त्या ठिकाणी कमिटी नेमली नसतांना संस्थेच्या पातळीवर त्या ठिकाणी अनेक शिक्षक भरले जातात. त्या शिक्षकांच्या बाबतीत सुध्दा प्रश्न निर्माण होईल. आज ज्यावेळेला असा महत्वाचा निर्णय सभागृहामध्ये घ्यावयाचा आहे अशा वेळी यु.जी.सी. चे स्पष्ट मत आपण समजावून घेतल्याशिवाय याबाबतीतील निर्णय घेणे उचित होईल असे मला वाटत नाही. म्हणून यासंदर्भातील वस्तुस्थिती सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावी.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, पहिल्यांदा मी असत्य माहिती दुरुस्त करतो. अमरावती विद्यापीठाचे स्टॅट्युट माझ्याजवळ आहे. त्याच्यामध्ये असे म्हटले आहे की, नेट सेटची डिटेल योजना तयार होईल तेव्हा ती लागू होईल. तोपर्यंत काय होईल?

"The same procedure should be continued to be in operation till it is suitably replaced by the UGC."

युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशन जोपर्यंत ही व्यवस्था करीत नाही तोपर्यंत जुनीच व्यवस्था चालू राहील असे अमरावती विद्यापीठाच्या स्टॅट्युटमध्ये म्हटलेले आहे. अमरावती विद्यापीठाच्या ८९ च्या स्टॅट्युटमध्ये नेटसेट कंम्पलसरी आहे असे म्हटलेले आहे, असे माननीय मंत्री महोदय आपले म्हणणे आहे का? असेल तर ते अत्यंत चुकीचे आणि असत्य आहे. ९१ नंतरचा याबाबतीतील स्टॅट्युटच नाही. आपल्या निवेदनामध्ये आपण ८९ चा उल्लेख केला आहे. अमरावती विद्यापीठाच्या स्टॅट्युटमध्ये स्पष्टपणे हे वाक्य आहे की, ही अरेंजमेंट यु.जी.सी.कडून ज्या वेळेला येईल त्यावेळेला ७७ ची अरेंजमेंट रिप्लेस होईल. मग माझे म्हणणे स्पष्ट आहे की, विद्यापीठाने स्टॅट्युट दुरुस्त केले नाही याचे कारण विद्यापीठांना असे वाटले होते की, आपल्याला लोकांनी वेडे म्हणून नये. जी परीक्षाच झाली नाही ती ते कशी कंम्पलसरी करतील? आपल्याला लोकांनी वेडे म्हणावे हे कोणाला तरी आवडेल का? हे शासनामध्ये होऊ शकते. जी परीक्षा झालीच नाही ती पास करावी असा हुकूम काढला. ७ फेब्रुवारी ९४ मध्ये हुकूम काढला. त्यावेळी परीक्षा व्हावयाची होती. त्यामुळे विद्यापीठांची यामध्ये काही चूक आहे अशातला भाग नाही. आता विद्यापीठाने केलेले आहे. पुरेसे लोक मिळतात. माननीय मंत्री श्री दिलीप वळसे-पाटील यांनी सर्व व्हाईस चान्सलरची बैठक घेतली, डिसेंबर ९९ मध्ये स्टॅट्युट किंवा डायरेक्टीव्ह झाले. माझ्या एका प्रश्नाचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही आणि ते उत्तर द्यावे असा आग्रह मी धरत नाही कारण ते चूकच आहे. ते लोकल प्रॉडक्शन आहे त्यामध्ये चार अटी आहेत आणि त्याबाबत तुम्ही पुनर्विचार करतो असे सांगत आहात. जरुर करा. मग माझे एकच म्हणणे आहे की, २२ डिसेंबर ९५ ला लावलेल्या अटीमध्ये हे समाविष्ट केले आहे. त्यातील दोन अटी तुम्ही मागे घेतल्या आहेत. मग ही एक अट ताबडतोब मागे घेऊन आपण तशा प्रकारचे आदेश काढावेत आणि बाकीची तपासणी करावी, पूनर्विचार करावा त्यांना मिळणारी पुढील प्रमोशन्स आपण रोखून ठेवलेले आहेत ते पूर्णपणे चूक आहे. आपण सहानुभूतीपूर्वक याबाबतीत विचार करतो म्हणता म्हणून मी हे बोलतो. माझे म्हणणे आहे की, यु.जी.सी. ने आता तुम्हाला कळविलेले आहे. आणखी एक सांगू इच्छितो की, ड्युली कॉन्स्टीट्युटेड सिलेक्शन कमिटीकडून जे भरती झालेले नसतील त्यांच्याबाबतीत आम्ही बोलत नाही. कोणी जर असा निवड समिती टाळून भरला असेल तर आम्ही त्यांच्यासाठी बोलत नाही. ड्युली कॉन्स्टीट्युटेड सिलेक्शन कमिटीकडून जे भरती झालेले आहेत आणि त्या सर्व ठिकाणी शासनाचे प्रतिनिधी आहेत, त्या कमिटीच्याच कॉन्स्टीट्युशनमध्ये तसे आहे कारण जी.आर.मध्ये तसे होते. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, ड्युली कॉन्स्टीट्युटेड सिलेक्शन कमिटीकडून या एप्रिल २००० च्या युजीसी रेग्युलेशनच्या पूर्वी जे भरती झाले आहेत त्यांच्याबाबतीत किमान गुड गेश्चर म्हणून या लोकांची पुढची प्रमोशन्स आपण रोखली आहेत त्याबाबतचे आदेश आपण ताबडतोब मागे घ्यावेत. त्यातील दोन आदेश तत्कालीन मंत्री महोदयांनी मागे घेतलेले आहेत, त्याप्रमाणे आपण प्रमोशन / प्लेसमेंट रोखणारा हा आदेश मागे घ्यावा आणि मग या बाबतीत पुनर्विचार करावा. तसे आपण कराल काय?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, १९९१ साली नेटची पात्रतेची अट जी आपण लागू केली. ती अट लागू केल्यानंतर त्या काळामध्ये रिक्रुटेड जे प्राध्यापक आहेत त्यांनी ही पात्रता धारण केलेली नाही हे लक्षात घेतल्यानंरच त्या प्राध्यापकांची नेटची परीक्षा पास व्हावी त्यासाठीच मार्च ९४ मध्ये, मार्च ९५ मध्ये, मार्च ९६ मध्ये मुदतवाढ दिली आणि ही मुदत वाढ मुळातच त्यासाठी दिली होती. कारण १९९१ मध्ये नेट च्या परीक्षेची व्यवस्था तेथे उपलब्ध होती. १९९५ मध्ये ज्यावेळेला आपण सेटच्या परीक्षेची व्यवस्था उपलब्ध करुन दिली आणि जे ऑलरेडी रिक्रुटेड आहेत अशा प्राध्यापकांनी ९१ मध्ये इंग्रजी माध्यमातून किंवा हिंदी माध्यमातून किंवा ९५ मध्ये राज्याची सेट आपण सुरु केली ती मराठी माध्यमातून किंवा लोकल भाषेतून ही परीक्षा पास होण्याच्या संदर्भात वेळोवेळी आपण सन्माननीय प्राध्यापकांना संधी उपलब्ध करुन दिल्यानंतर देखील त्याचा फायदा ज्यावेळेला प्राध्यापकांनी घेतला नाही आणि आज उपलब्ध करुन दिलेल्या संधी हा शासनाचा वेडेपणा आहे असे जर सन्माननीय सदस्य म्हणत असतील.

**(श्री.कमलकिशोर कदम)** सभापतीस्थानी-तालिका सभापती

हा शासनाने केलेला वेडेपणा आहे असे सन्माननीय सदस्य म्हणत असतील तर ही बाब न्यायाला धरुन होत नाही, एवढेच मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

**प्रा.बी.टी.देशमुख :** संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच येत नाही. कायद्याने अट प्रिस्क्राईब करण्याचा प्रश्न आहे. अध्यक्ष महाराज, मी हे या पूर्वी या सभागृहामध्ये दहावेळा बोललेलो आहे. हा कोणावर कृपा करण्याचा

प्रश्न नाही.

Lawful qualification as prescribed by lawful legal instrument. I hope, I am very clear.

सुटेबल जे काही लॉ फुल इन्स्ट्रुमेंट आहे. स्टॅट्युट आहे ते दुरुस्त करुन पात्रता दुरुस्त करणे... आपण विद्यापीठावर दोष ठेवला म्हणून मी ते शब्द वापरले. माझे स्पष्ट म्हणणे आहे की, लिगल इन्स्ट्रुमेंट आपण यापूर्वी कधी दुरुस्त केले नाही, या संबंधात सभागृहामध्ये सतत ७ वर्षे आम्ही भांडत आहोत. कायद्यामध्ये सुधारणा करत नाही, स्टॅट्युटमध्ये सुधारणा करत नाही. आपण फक्त जी. आर. काढला आणि सांगता, त्यानंतर दुसऱ्या दिवशी तो जी.आर. परत घेता, त्यानंतर तिसऱ्या दिवशी पुन्हा जी.आर. काढला आणि मग वर्गणीचे काम सुरु होते.

माझे म्हणणे असे आहे की, हे सरळसरळ वर्गणीशी संबंधित असलेले प्रकरण आहे. अशाप्रकारे लुपहोल ठेवणे हे कोणाला हितकारक आहे? स्टॅट्युटमध्ये दुरुस्ती करायची नाही. युजीसीने आपल्या सचिवांना वारंवार कळविले आहे. त्यांचे एक पत्र मी मघा वाचून दाखविलेले आहे. १९९३ ची दोन पत्रे माझ्याकडे आहेत. युजीसी वारंवार सांगत आहे की, तुम्ही तुमचे स्टॅट्युट दुरुस्त करा. ते आपण दुरुस्त केले नाही. आपण मंत्री झाल्यानंतर ते दुरुस्त केले. माझे म्हणणे असे आहे की, त्या पूर्वीच्या लोकांना नेटसेट लागू नाही, असे यु.जी.सी.ने दिनांक ४ एप्रिलला कळविलेले आहे. आपण बाकीच्या दोन अटी मागे घेतलेल्या आहेत. दिनांक २२ डिसेंबर ९५ च्या जी.आर.मध्ये आणखी दुरुस्ती करण्याची गोष्ट आहे. त्यामध्ये दोन गोष्टी काढून टाकल्या तसेच हीही गोष्ट काढून टाका आणि बाकी तपासा. माझे असे म्हणणे आहे की, त्यांचे जे प्रमोशन रोखलेले आहे. ते रोखू नका, तेवढा आपण आदेश काढावा म्हणजे आपण जे आम्ही तपासून घेऊ असे म्हणाला याला काही प्रमाणिकपणा आहे असे लोकांना वाटेल.

**तालिका सभापती (श्री.कमलकिशोर कदम) :** आपण स्पेसिफिक प्रश्न विचारा. लांबलचक भाषण करु नका.

**प्रा.बी.टी.देशमुख :** मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो. प्रश्न असा आहे की, दिनांक २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयामध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी न ठरविलेल्या ज्या गोष्टी होत्या त्या तीन-चार गोष्टी यामध्ये घातलेल्या आहेत, त्यामधील एक-दोन गोष्टी मागे घेतल्या. इंक्रीमेंट रोखून ठेवा, देऊ नका हे यु.जी.सी. च्या परिपत्रकात नाही, ते तुम्ही मागे घेतले. काही गोष्टी आपण मागे घेतल्या. त्याचबरोबर त्यांना प्रमोशन दिले जाणार नाही, ही जी गोष्ट आहे ती आपण मागे घ्या, बाकीचे एक्झामीन करा, तसे आपण कराल काय?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सन्माननीय सदस्य सांगतात की, त्या काळामध्ये त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी ४ दिवस बसून बैठक घेतली, त्यावेळेस राज्याचे मुख्य सचिव उपस्थित होते, शिक्षण सचिव उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये नेमकी काय चर्चा झाली याचे मिनिटस् आपल्याला तपासावे लागतील.... त्या बैठकीच्या बाहेर जाऊन जर एखाद्या अधिकाऱ्यांनी चुकीचे जी.आर. किंवा ऑर्डर्स काढले असतील तर तोसुध्दा चौकशीचा भाग होऊ शकतो. त्या संदर्भामध्येदेखील चौकशी करु आवश्यक असेल तर त्या संदर्भात ॲक्शनसुध्दा घेऊ. परंतु त्या काळामध्ये काय ठरले, ऑर्डर्स काय निघाल्या.... मला एवढेच दिसते की, १९९१ सालामध्ये ज्यावेळेस नेटची पात्रता निश्चित केली त्यानंतर राज्य शासनाने त्या संदर्भाने सगळ्या विद्यापीठांना आदेश देऊन याची अमंलबजावणी करण्याबाबत कळविले होते. विद्यापीठांनीसुध्दा स्टॅट्युटमध्ये दुरुस्ती करुन किंवा संबंधीत संस्थांना ऑर्डर्स काढून ही यामध्ये नवीन पात्रतेची अट आहे हे कळवावयास पाहिजे. या संबंधाने विद्यापीठांनी त्यांची जबाबदारी पार पाडली की नाही हा चर्चेचा विषय होऊ शकेल.

**प्रा.बी.टी.देशमुख** : शिक्षकांचा यामध्ये काय दोष आहे?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** बरोबर आहे.. कृपया आपण माझे ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य बोलत असतांना मी शांतपणे त्यांचे बोलणे ऐकून घेतो.. चुकीचे बोलले तर कदाचित रेकॉर्डवर येईल... सन्माननीय सदस्यांचा या प्रश्नांच्या संदर्भामध्ये पूर्ण अभ्यास आहे. त्यांच्याकडे सगळे रेकॉर्ड उपलब्ध आहे. नाही म्हटले तरी मी मंत्री होऊन वर्ष झाले. तसे या क्षेत्राच्या संदर्भातील मी नवीन मंत्री आहे. **म्हणून या संदर्भामध्ये सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केलेली आहे. त्या संदर्भाने तपासावे लागेल. त्यांची प्रमोशन्स थांबविण्याबाबत जे काही निर्णय घेतलेले असतील, यांच्याशीसुध्दा वित्त विभागाचा संबंध असल्यामुळे वित्त विभागाची मान्यता घेऊनच-शेवटी यामध्ये फायनान्शियल बोजा किती वाढणार आहे.... शेवटी यामध्ये वित्तीय बर्डन वाढणार आहे आणि वित्तीय बर्डन वाढते त्या त्या वेळेला वित्त विभागाची संमती घेतल्याशिवाय असा सो मोटो डिसिझन घेता येणार नाही. परंतु ज्या ज्या कर्मचारी आणि शिक्षकांवर अन्याय झालेला आहे त्या शिक्षकांवरील अन्याय दूर करण्याची भूमिका राज्यशासनाची राहील आणि या संदर्भामध्ये विचार विनिमय करुन निश्चित वेळेमध्ये या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या संदर्भामध्ये मी या ठिकाणी वचनबध्द आहे.**

**श्री.अशोक मोडक :** सभापती महोदय, मुळातच ४ एप्रिल २००० चे जे परिपत्रक आहे त्या परिपत्रकामध्ये इनकंसीस्टंसी आहे हे आता लक्षात आले आहे. माझा प्रश्न असा आहे की, जे सहस्त्रो प्राध्यापकांच्या जीवाशी खेळ चालला आहे तेव्हा हे यापूर्वी कां लक्षात आले नाही ? याच्या १४ क्रमांकाच्या परिच्छेदामध्ये सुरवातीला काय म्हटले आहे ? यात म्हटले आहे की, या विशिष्ट परिपत्रकामुळे या अगोदरच्या तरतुदी निष्प्रभावित केल्या जातील म्हणजे १९ सप्टेंबर १९९१ व २४ डिसेंबरच्या या दोन तरतुदी आहेत. परंतु सर्वात शेवटी जो प्रोव्हीजो आहे तो अतिशय महत्वाचा आहे.

"Then requisite minimum qualification" हा जो शब्द समुह आहे. That is to be understood. एकदा आपण हे मान्य केले आहे. एखाद्या व्यक्तीच्या नेमणुकीच्या पहिल्याच दिवशी ज्या कोणत्या क्वालिफिकेशन्स आवश्यक असतील त्यासंबंधी हा प्रोव्हीजो दिला गेला आहे. स्वाभाविकपणे त्या अगोदरच्या तरतूदी निष्प्रभ केल्या जातील असे म्हटले आहे त्यात हे विसंगत आहे हे सरळ-सरळ दिसते. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या संदर्भामध्ये आवश्यक क्लेरिफिकेशन जर डिसेंबरमध्ये मागविले जाते ते या अगोदरच का मागविले नाही ? दुसरा प्रश्न असा आहे की, १९९१ सालापासून या नेटसेटच्या परीक्षांचा घोळ चालूच आहे त्याला प्राध्यापक जबाबदार नाहीत आणि एकाअर्थाने राज्य शासन जबाबदार आहे तर आता राज्यशासनाने हे जे दोन प्रोव्हीजो जोडलेले आहे त्याचा आधार घेवून मा.सदस्य बी.टी.देशमुख म्हणाले त्याप्रमाणे त्याचा नक्की गंभीरपणे विचार करावा. माझा पहिला प्रश्न असा आहे की, हे क्लेरिफिकेशन यापूर्वी कां मागविले नाही आणि दुसरा प्रश्न असा आहे की, जर समजा एका अर्थाने याचे दायित्व शासनाच्या शिरावर असेल तर आणि ते आपल्याला मान्य असेल तर स्वाभाविकपणे थोडेसे / लिनियंट ॲप्रोच स्वीकारले जाईल काय ?

**तालिका सभापती :** लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने साधारणपणे दोन तीन प्रश्न विचारावयाचे असतात. या विषयावर आता बरीच चर्चा झालेली आहे.

**श्री.दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, एप्रिल २००० ला युजीसी ने जे नोटीफिकेशन पाठविले त्या नोटीफिकेशचा उल्लेख मा. सदस्य वारंवार करतात. हा उल्लेख करतांना ते यामधील प्रोव्हीजोचा उल्लेख करतात. परंतु प्रोव्हीजो वाचतांना त्यांनी मेन क्लॉज सुध्दा वाचला पाहिजे. मेन कायदा आणि प्रोव्हीजो एकत्र वाचले तर यातून आवश्यक असा अर्थ निघू शकतो. राज्यशासनाची या संदर्भामध्ये स्पष्ट भूमिका आहे. यूजीसी समोर ज्यावेळेला राज्याच्या सचिवांनी चर्चा केली त्यावेळेला त्या चर्चेच्या माध्यमातून या बाबी उपस्थित केल्या होत्या. त्याचा खुलासा त्यांच्याकडून प्राप्त करुन घेणे अभिप्रेत आहे. हा दुसरा प्रश्न आहे. याचा बोजा राज्य शासनावर म्हणता परंतु तशी परिस्थिती नाही. ९१ सालामध्ये ज्यावेळेला किमान पात्रता लागू केली त्यावेळेला ती लागू केल्यानंतर नेट आणि सेटच्या परीक्षेची व्यवस्था आपल्याकडे नव्हती. नेट परीक्षाची व्यवस्था झाल्यानंतर ९५ सालामध्ये त्यावेळेला आपण सेट परीक्षेची व्यवस्था केली. त्यावेळेला कदाचित ९१ आणि ९५ च्या कालावधीमध्ये राज्य शासनाने या परीक्षांची उपलब्धता करुन दिली नाही म्हणून ही जबाबदारी राज्य शासनावर टाकली ही बाब समजू शकतो. आपण ९५ नंतर मराठीमध्ये आणि लोकल लँग्वेजमध्ये सेट परीक्षेची व्यवस्था करुन दिली. राज्यामध्ये ही व्यवस्था उपलब्ध करुन दिल्यानंतर प्राध्यापकांनी मिनिमम क्वॉलिफिकेशन प्राप्त करुन घेण्याच्या बाबतीत औदासिन्य दाखविले हे बरोबर नाही. १९९५ पूर्वीचा विचार आपण करु शकू. १९९५ नंतर आपण ही व्यवस्था करुन दिलेली आहे. त्यावेळी प्राध्यापकांनी पात्रता प्राप्त करुन घेणे हे त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने आवश्यक होते. तसे त्यांनी केले नाही. तरी देखील हा प्रश्न राज्यातील महत्वाचा प्रश्न आहे. ८-१० हजार शिक्षकांशी संबंधित असा प्रश्न आहे. या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची राज्य शासनाची तयारी आहे. मी या बाबतीत सभागृहाला आश्वासीत केलेले आहे. निर्धारित वेळेमध्ये फायनान्सियल लायबिलीटी पाहून व यूनीव्हर्सिटीकडून क्लॅरिफिकेशन मिळाल्यानंतर तीन महिन्यामध्ये या बाबत आवश्यक तो निर्णय राज्य शासन घेईल.

**श्री.वसंत काळे :** ४ एप्रिलला जो अधिनियम काढलेला आहे त्याच्या मेन क्लॉजमधील पहिले वाक्य मा.सदस्य श्री.मोडक यांनी या ठिकाणी उधृत केले आहे. १९९१ आणि १९९८ चा अधिनियम सुपरसीड केला. या सुपरसीड केलेल्या १९९१ च्या अधिनियमाचा आधार घेऊन तुम्ही जसा इंटरप्रीटीशन

करीत आहात ते तसे नाही. सर्वसाधारणतः कायदा आम्हाला जो समजतो त्याप्रमाणे ४ एप्रिलच्या अधिनियमामध्ये लिहलेले आहे की, किमान पात्रतेसाठी नेटसेटची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. परंतु जर नेटसेटची परीक्षा उत्तीर्ण केली नसेल तर त्या बाबतीत प्रोव्हीजो मध्ये अशी तरतूद आहे की पात्र उमेदवार नसेल तर अट शिथिल करण्यासाठी परवानगी मागा. दुसरा प्रोव्हीजोमध्ये असे म्हटले आहे की ड्यूली कॉन्स्टिट्यूटेड सिलेक्शन कमिटी यू.जी.सी.च्या कायद्याप्रमाणे निर्माण झालेली आहे. त्यामध्ये शासनाचा प्रतिनिधी असतो, तज्ञ असतो. व्हाईस चान्सलरचा प्रतिनिधी असतो. त्या सिलेक्शन कमिटीमध्ये कधीही असा प्रश्न उपस्थित झाला नाही. जाहीरात कधीही नेटसेटची दिलेली नाही. त्यावेळी सर्व जाहिराती 'बी प्लस' क्वॉलिफिकेशनच्या पात्रतेसाठी दिलेल्या आहेत. त्या सिलेक्शन समितीमध्ये शासनाचा प्रतिनिधी आहे. शासनाने युनिव्हर्सिटीला कळविले, जी.आर.पाठविला परंतु विद्यापीठाने वैधानिक नियम केले नाही. लिगल सँक्टीटी या ठिकाणी केलेले नसल्यामुळे, रिक्रुटमेंट रुल्समध्ये नवीन तरतूदी इनक्ल्युड केलेल्या नसल्यामुळे 'बी प्लस क्वॉलिफिकेशन" हे बरोबर आहे. १० हजार प्राध्यापक या कक्षेमध्ये येत आहे. मा.मंत्री महोदय या ठिकाणी हसत हसत म्हणाले की, बी.टी.देशमुख तुम्ही अनुभवी आहात. तुमचा बराच अभ्यास आहे. मी गेल्या एका वर्षापासून या खात्याचा मंत्री झाल्यामुळे मला अनुभव कमी आहे.

**तालिका सभापती (श्री.कमलकिशोर कदम)** : या प्रश्नाची पार्श्वभूमी सरकारला आणि सर्वांनाच समजलेली आहे. आपण फक्त स्पेसिफिक प्रश्न विचारा.

**श्री.वसंत काळे** : यू.जी.सी.ने जो क्लॉज/प्रोव्हीजो केला आहे त्याचा अर्थ शासन चुकीचा काढत आहे आणि शासन क्लॅरीफिकेशन मागण्याचा खटाटोप करीत आहे. आमचे सचिव त्या ठिकाणी जाऊन आले आणि त्यांनी चर्चा केली असे मा. मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. या चर्चेमध्ये असे काही ठरले आहे काय, शासनाने एक पत्र पाठवावयाचे आणि यांनीच तिकडे जाऊन उत्तर लिहून आणावयाचे आणि पोरांचा बळी घ्यायचा. हे शासन सचिव चालवितात की मंत्री चालवितात असा संभ्रम यामधून निर्माण होतो. त्यांच्या स्टेटमेंटमध्ये त्यांनी असे सांगितले की, सचिव तेथे गेले आणि त्यांनी जे सांगितले त्याचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. मग हे पॅकेज ठरलेले आहे काय? असे कटकारस्थान ठरलेले आहे काय ? महाराष्ट्र शासनाने येथील जनतेला असे सांगितले की, आम्ही याचा परत खुलासा युजीसीकडे मागवितो आणि सचिवांनी जावून युजीसीकडून त्यांना पाहिजे तो खुलासा आणावयाचा. तरी अशा स्वरुपाचे पॅकेज किंवा कट ठरलेला आहे काय ? चुकीचे इंटरप्रिटीशन करुन या पोरांची कत्तल करण्याचा जो उद्योग आहे तो बंद करुन शब्दशः अर्थ घेऊन या प्रोव्हीझो प्रमाणे या १०,००० प्राध्यापकांना आपण कायम करणार आहात काय ?

**श्री.दिलिप वळसे पाटील** : असा कट किंवा असे काही पॅकेज ठरलेले नाही. **या सर्व प्राध्यापकांना नेटसेटच्या अटीमधून वगळण्यासंबंधी मी अतिशय सुस्पष्ट अशी भूमिका या सभागृहामध्ये मांडलेली आहे. काही बाबींच्या संदर्भामध्ये वित्त विभाग आणि बाकीच्या विभागांचा खुलासा घ्यावा लागेल. तो घेतल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीमध्ये या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे अभिवचन मी या ठिकाणी दिलेले आहे.** त्याच्या बरोबरीनेच यापुढील काळामध्ये म्हणजे १.१.९६ नंतर जेव्हा पासून **पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे त्यानंतरच्या काळामध्ये १९९९ मध्ये डायरेक्शन्स काढल्या आहेत. त्या अशा की,९९ नंतर कोठल्याही महाविद्यालयामध्ये, कुठल्याही विद्यापीठामध्ये नेटसेटच्या शिवाय कोणत्याही शिक्षकांची भरती झाली तर ती भरती आम्ही ग्राह्य धरणार नाही. ज्यांनी ही भरती केली असेल ते दोषी असतील आणि ते कारवाईस पात्र राहतील. अशा स्पष्ट सूचनासुध्दा मी या ठिकाणी देत आहे.**

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महोदय, डिसेंबर ९९ मध्ये आपण सक्तिचे केले याबद्दल आभारी आहे. गेले अनेक वर्षे युजीसीप्रमाणे स्टॅट्युट अमेंड करा असे आम्ही म्हणतो आहोत. पण दोन चुकीच्या गोष्टी मंत्री महोदय सांगत आहेत, आणि एक सहानूभूतीचे आश्वासन देत आहेत. नेटसेट हे कॅन्डीडेटला लागू आहे, टिचरला नाही. या सर्व इन्स्ट्रक्शन्सप्रमाणे NET-SET is applicable to candidates and not to teachers. अमरावती विद्यापीठाच्यासंदर्भात आपण चुकीचे सांगितले. ते शिक्षक परीक्षेला बसतच नाहीत. कारण ते कसे बसतील ? त्या ठिकाणी व्ही.सी.चे प्रतिनिधी, शासनाचे प्रतिनिधी पाठविले, निवड केली, त्यांना आपण नियुक्त केले. मान्यता दिली. माझे म्हणणे असे आहे की, मेन क्लॉज आणि प्रोव्हीजो यांचेसुध्दा त्यांनी कन्फ्युशन केले गेले आहे. एक प्रोव्हीजो असा आहे की, पुढे जर अडचण आली तर युजीसीच्या परवानगीने आणि मागचे म्हणाल तर दुसरा प्रोव्हीजो असा की duly constituted committee यांच्याकडून जी भरती झाली आणि then time requisite minimum qualification ज्याला आहे त्याला ते लागू नाही असे त्यामध्ये स्पष्ट आहे. मंत्री महोदय, आपण तीन महिन्यात निर्णय घेणार असे सांगितले त्याबद्दल मी आभारी आहे. पण एक सांगतो की, सिन्सीयारिटी ऑफ परपज काही तरी पाहिजे. यु.जी.सी.कडून आता काही लिहून आणण्याची ही गोष्ट नाही. तुमच्या टेबलवर जे कागद आहेत, जे रेग्युलेशन आहेत ते पाहून निर्णय घेण्याची गोष्ट आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, यामध्ये आपण काहीच रिलिफ देणार नसलात तर केवळ निषेध करुन बाहेर जाण्याशिवाय आमच्या हाती काही उरत नाही. तीन महिन्यांमध्ये निर्णय तुम्ही जरुर घ्या. पण तत्पूर्वी तुम्ही ठामपणे असे सांगा की त्यांचे वरच्या श्रेणीतील प्लेसमेंट आपण जे रोखून ठेवले ते मोकळे करण्याचा निर्णय आपण निर्गमित करु, मी आपल्याला सांगू इच्छितो की, अध्यक्ष महोदय आपण स्वतः त्यावेळी होता. पाच पाच तास चिफ सेक्रेटरी बसले, वित्त सचिव बसले आणि त्यांनी ॲप्रुव्ह करुन दिलेली गोष्ट यांनी उलटी केली. तेव्हा विचारले नाही. आता सुलटी करतांना पुन्हा एक वित्त विभागाची आडकाठी घालून देण्याचा त्यांचा विचार दिसतो. तरी तुम्ही ठामपणे सांगा. त्यांचे जे प्लेसमेंट रोखलेले आहे ते सुरु करण्याचे आदेश आम्ही उद्या काढू. बाकीचे निर्णय तीन महिन्यामध्ये घेऊ, यामध्ये आपल्याला काय अडचण आहे ?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : या सभागृहामध्ये हे अनेक वेळा स्पष्ट केलेले आहे की, फायनान्शियल संबंध आहे असे निर्णय वित्त विभागाला विचारल्याशिवाय घेता येत नाहीत.

**श्री.बी.टी.देशमुखः** कॅबिनेटने निर्णय घेतला आहे.

**श्री.दिलीप वळसे पाटील** : आपण म्हणता ते १०० टक्के खरे आहे असा मी विश्वास ठेवतो. या सदनामधील ती परंपरा आहे. तरीसुध्दा या खात्याचा मंत्री म्हणून काम करतांना मी जरी मंत्री असलो तरी या राज्यातील प्रशासन आपल्याला माहिती आहे आणि मलाही माहिती आहे. मघाशी सन्माननीय सदस्य जाता जाता एक शेरा मारुन गेले. मंत्री निर्णय घेतात की सचिव घेतात. तरी सुध्दा मी आपल्याला असे सांगतो की तीन महिन्यामध्ये या प्रश्नाच्या बाबतीत आपण अंतिम निर्णय घेणार आहोत. अशा परिस्थितीमध्ये प्लेसमेन्टच्या बाबतीत अगोदर निर्णय घेण्यात आल्यामुळे काय फरक पडेल हे आपण मला सांगितले तर बरे होईल. या संदर्भात पूर्णपणे त्यांना प्रोटेक्शन देण्याची व्यवस्था करु.

**तालिका सभापती** : आता दुसरी लक्षवेधी सूचना देण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मला एक प्रश्न विचारावयाचा आहे.

**श्री.वसंतराव काळे** : सभापती महोदय, दहा हजार शिक्षकांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे.

**श्री.गोपालदास अग्रवाल** : आता पुढचे कामकाज पुकारलेले आहे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

**श्री.सुरेश पाटील** : या लक्षवेधी सूचनेवर माझे नाव आहे तेव्हा मला एक प्रश्न विचारु द्यावा.

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावर अशा प्रकारे चर्चा करता येणार नाही असा आपला नियम आहे.

**श्री.बी.टी.देशमुखः** यावर जर चर्चा होणार नसेल तर ते बरोबर नाही. हा नियम नेटसेटग्रस्त शिक्षकांसाठी आहे काय ? १० हजार लोकांसाठी हा नियम आहे काय ? मला आपण एक प्रश्न विचारु द्या. मंत्रिमहोदयांनी सांगितले म्हणून मला खुलासा करावयाचा आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या मी असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की नियमाप्रमाणे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावर अशा प्रकारे चर्चा करता येणार नाही. परंतु हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळे मी दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देऊन ५० मिनिटे यावर चर्चा होऊ दिली. एका लक्षवेधी सूचनेवर सदनाचा किती वेळ घ्यावयाचा याला सुध्दा मर्यादा आहेत. दुसऱ्या मार्गाने आपण पुन्हा हा प्रश्न उपस्थित करु शकता.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले त्याचा निषेध करुन आम्ही बर्हिगमन करतो.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांनी बर्हिगमन केले)

*****

# नमुने व प्रपत्रे वारंवार बदलल्यामुळे सुधारित वेतनश्रेणीची थकबाकी देण्यास होणारा विलंब

*महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर २००० : तिसरे अधिवेशन २०००*

(१) * ९०५४. **सर्वश्री बी.टी.देशमुख,व्हि.यु.डायगव्हाणे,सुरेश पाटील, प.म.पाटील** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय-

(१) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणीची थकबाकी देण्यासाठी दिनांक ९ मे, २००० रोजीच्या शासननिर्णयान्वये संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद (रुपये ४०० ते ५०० कोटी) उच्च शिक्षण संचालकाकडे शासनाने सुपूर्त केल्यानंतरही थकबाकी सादर करावयाच्या नमुन्यामध्ये वारंवार बदल करणे, असे नमुने भरुन सादर करण्यासाठी प्राचार्यांना पुरेसा वेळ न देणे, अनेकवेळा असे नमुने भरुन पाठविण्याची मुदत निघुन गेल्यावर त्या मुदतीत प्रपत्रे भरुन पाठवा असे आदेश देणे, अशा कारभारामुळे थकबाकी अदा करणेच्या कामात उच्च शिक्षण संचालकांना संपूर्णपणे अपयश आले आहे अशी तक्रार, शेकडो शिक्षकांनी पुणे येथे उच्च शिक्षण संचालकांच्या कार्यालयासमोर ९ ऑक्टोबर, २००० रोजी केलेल्या धरणे आंदोलनाच्या वेळी, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (एमफक्टो) अध्यक्ष व सचिवांनी उच्च शिक्षण संचालकांना एक निवेदन देऊ केलेली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, शिक्षण संचालकाच्या आदेशावरुन सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांनी वेळोवेळी नमुने व प्रपत्रे बदलविण्याची उदाहरणे दिनांक ९ ऑक्टोबर, २००० रोजीच्या या तक्रार निवेदनामध्ये नमूद आहेत हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, उच्च शिक्षण संचालकांच्या आदेशावरुन सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी ११ मे, २००० रोजी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र पाठवून सर्व नमुने १७ मे, २००० पर्यंत भरुन पाठविण्याच्या सूचना निर्गमित केल्या, पुन्हा नमुन्यामध्ये बदल करणारे पत्र ५ जुलै, २००० रोजी पाठवून १० जुलै २००० पर्यंत माहिती पाठवा अशा सूचना निर्गमित केल्या, पुन्हा ५ जुलैच्या सूचनांमध्ये बदल करणारे आदेश १३ जुलै, २००० रोजी निर्गमित केले, हेही खरे आहे काय;

(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे वा करण्याचे योजिले आहे;

(५) अद्याप कोणतीच उपाययोजना केलेली नसल्यास याबावत होणाऱ्या विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय. या निवेदनात विद्यापीठे/महाविद्यालयीन शिक्षकांना ५ व्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत तक्रार केली आहे.

(२) शिक्षण संचालकांच्या आदेशावरुन सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, यांनी वेळोवेळी नमुने व प्रपत्र बदलण्याची अशी कोणतीही उदाहरणे दिनांक ९.१०.२००० च्या निवेदनात नमूद केलेली नाहीत.

(३) शिक्षण संचालकांनी नेमलेल्या समितीने ५ व्या वेतन आयोगाच्या थकबाकी संदर्भात भरुन द्यावयाचे विवरणपत्र विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांनी दिनांक ११ मे, २००० रोजी प्राचार्यांना पाठविलेल्या पत्रात, दिनांक १७.५.२००० पर्यंत भरुन द्यावे असे सूचीत केले होते. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, यांनी दिनांक २७.६.२००० च्या पत्रान्वये मागविलेली माहिती सर्व प्राचार्यांनी दिनांक १०.७.२००० पर्यंत भरुन पाठवावी असे सहसंचालकांनी दिनांक ५.७.२००० च्या पत्रान्वये कळविले होते. तसेच दिनांक ११.७.२००० च्या शिक्षण संचालकांच्या पत्रानुसार मागविण्यात आलेली माहिती सहसंचालकांनी दिनांक १३.७.२००० च्या पत्रान्वये मागितली होती.

(४) शिक्षकांना वेतनाची थकबाकी अदा करण्यासाठी रु.३८३ कोटींची रक्कम शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या महाविद्यालयाचे परिपूर्ण प्रस्ताव संचालनालयाला प्राप्त झालेले आहेत त्यांना थकबाकीची रक्कम वितरीत करण्याचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न भाग (४) ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रश्न उद्‌भवत नाही.

(श्री.अनिस अहमद, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्यासाठी)

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, हा चातुर्वर्ग व्यवस्थेचा प्रवास आहे. या ठिकाणी चौथ्या वर्गाची थकबाकी देण्याचा हा प्रश्न आहे. पहिल्या तीन वर्गाची पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यात आलेली आहे. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत केंद्र सरकारकडून ८० टक्क्यांचे अनुदान ही थकबाकी देण्यासाठी मिळणार आहे. यासाठी जवळ जवळ ७०० कोटी रुपये आपल्याला केंद्राकडून मिळतील असे राज्यमंत्री महोदयांनी या सभागृहात सांगितले होते. ११ मे रोजी पत्र पाठवायचे आणि १७ मे रोजी तक्ते भरुन मागवायचे असे चाललेले आहे. ५ जुलैला पत्र पाठविले आणि १० जुलैला कंप्लायन्स मागायचा, ११ जुलैला पत्र पाठविले आणि १३ जुलैला कंप्लायन्स मागविला. पुण्याच्या बाबतीत प्रश्न भाग २ च्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "शिक्षण संचालकांच्या आदेशावरुन सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, यांनी वेळोवेळी नमुने व प्रपत्रे बदलण्याची अशी कोणतीही उदाहरणे दिनांक ९.१०.२००० च्या निवेदनात नमूद केलेली नाहीत. अध्यक्ष महोदय, "९ ऑक्टोबर २००० चे निवेदन मिळाले आहे काय?" या प्रश्नाला "होय" असे उत्तरामध्ये सांगितले आहे. त्या निवेदनाची प्रत माझ्याकडे आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनासुद्धा त्या निवेदनाची प्रत मिळाली आहे. हे त्यांनी मान्य केले आहे तेव्हा पुण्याच्या सह-संचालकांनी तीन वेळा प्रपत्रे बदलली ही तक्रार निवेदनात आहे ही गोष्ट खरी आहे काय?

**श्री.अनिस अहमद :** अध्यक्ष महोदय, प्रश्न समझ मे नही आया. कृपया दुबारा पुछे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महोदय, प्रश्न असा आहे की, सरकारने जवळजवळ ४०० कोटी रुपये थकीत बाकी घेण्यासाठी ९ मे २००० च्या शासननिर्णयाने उच्च शिक्षण संचालकांकडे दिले. पण या पैशांचे वाटप होत नाही म्हणून शेकडो शिक्षकांनी मोर्चा काढला. डॉ.अरुण दिक्षित हे महासंघाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी व सरचिटणीस सदाशिवन यांनी निवेदन दिले होते. त्याला "होय " असे उत्तर दिले आहे. ते निवेदन यांना मिळालेले आहे. त्या निवेदनामध्ये स्पष्टपणे पृष्ठ २ व ३ वर असा उल्लेख करण्यात आलेला आहे की, "(अ) ५ जुलै २००० रोजी संबंधित सह संचालकांनी यासंदर्भात पत्रक काढून शारीरिक शिक्षण संचालकांच्या/ग्रंथपालांच्या वेतननिश्चितीत बदल सुचविले आहेत. (ब) ९ जुलै २००० रोजी सह संचालकांनी दुसरे पत्रक काढून वेतन वाढीच्या तारखेसंबंधी बदल सुचविले आहेत. त्यामुळे एकदा केलेले हिशेब पुन्हा नव्याने करावे लागले. (क) संचालकांनी ११ जुलै २००० च्या पत्रानुसार प्रपत्रातील रकान्यात काही बदल सुचविले. हे आदेश सहसंचालकांनी १८ जुलै २००० रोजी महाविद्यालयांकडे पाठविले. त्यामुळे थकबाकी काढण्याच्या प्रक्रियेत बदल झाल्याने प्रपत्र सादर करण्यात उशीर झाला. वरील पत्रके महाविद्यालयांना खूप उशिराने मिळत गेली." असे असताना स्पष्टपणे नाही असे उत्तर यासंबंधीच्या प्रश्न भाग २ ला दिले आहे. त्यामुळे मूळ प्रश्नच बाजूला राहील. तरी ज्या तीन बाबींचा उल्लेख या ठिकाणी मी आता केला आहे त्या बाबी त्या निवेदनामध्ये आहेत काय?

**श्री.अनिस अहमद :** सभापति महोदय, सिर्फ पुना मे हि चेंज नही हुआ पुरे महाराष्ट्र में चेंज हुआ है. पूरे महाराष्ट्र में युनीफार्मीटी होनी चाहिए इसलिए यह किया गया है...

**श्री.बी.टी.देशमुख :** महाराष्ट्रात बदल झाले म्हणजे पुण्यात झाले नाही काय? पुण्यामध्ये जे बदल झालेले आहेत त्याची उदाहरणे ९ ऑक्टोबरच्या निवेदनामध्ये दिलेली असताना नाही असे उत्तर मंत्री महोदयांनी दिले आहे ते का म्हणून?

**सभापती :** पुणे महाराष्ट्रात आहे काय?

**श्री.बी.टी.देशमुख :** साऱ्या महाराष्ट्रामध्ये तीन वेळा बदल केले गेले. नागपूरमध्येही बदल केले गेले. ते तुम्ही मान्य केले. पुण्यामध्येही बदल केलेले आहेत त्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आलेला आहे. असे असताना पुण्यात बदल केलेले नाहीत असे म्हटले जात आहे हे बरोबर आहे काय?

**श्री.अनिस अहमद :** सभापति महोदय, हमारे पास निवेदन की जो कॉपी आयी है वह अंग्रेजी में है और माननीय सदस्य जो बता रहें है वह मराठी में है.

**श्री.बी.टी.देशमुख :** ९ ऑक्टोबर २००० चे उच्च शिक्षण संचालकांना सादर केलेले निवेदन मिळाल्याची सही शिक्का असलेली प्रत माझ्याकडे आहे. त्यावर डायरेक्टर ऑफ हायर एज्युकेशन यांच्या कार्यालयाचा शिक्का आहे. अध्यक्ष व सचिवांच्या सहीचे हे मराठीतुन दिलेले निवेदन आहे.

**श्री.अनिस अहमद :** अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिवर्सिटी ॲण्ड कॉलेज टीचर्स ऑरगनायझेशन ने यह निवेदन किया है.

**श्री.अरुण मेहता :** अध्यक्ष महोदय, राज्याची भाषा मराठी आहे. त्यामुळे निवेदन मराठीमध्ये मिळाले की इंग्रजीमध्ये मिळाले याचे महत्व या प्रश्नामध्ये काय आहे हे माझ्या ध्यानात आलेले नाही. निवेदन मराठी, इंग्रजी किंवा हिंदीमध्ये असले तरी त्या निवेदनामध्ये हे मुद्दे आहेत किंवा नाहीत? हा महत्वाचा भाग आहे. मिळालेले निवेदन इंग्रजीमध्ये आहे आणि सन्माननीय सदस्य मराठीमध्ये प्रश्न विचारीत आहेत असे सांगणे म्हणजे प्रश्नाचे उत्तर देण्याचे टाळणे असे आहे. तरी या बाबतीत अध्यक्ष महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**श्री.अनिस अहमद :** सभापति महोदय, जो निवेदन आया है वह अंग्रेजी में आया है...

**श्री.बी.टी.देशमुख :** निवेदनाच्या लेटरहेडचा फक्त मथळा इंग्रजीमध्ये आहे हे खरे आहे. मात्र ९ ऑक्टोबर २००० या तारखेला व या तारखेचे अध्यक्ष व सचिवांच्या सहीने दिलेले पोचपावतीचा सही शिक्का असलेले एकच निवेदन आहे व ते मराठीतुन आहे. दुसरे कोणतेही निवेदन नाही.

**श्री.प्रकाश जावडेकर :** सभापती महोदय, हे लेटर हेड इंग्रजीतून आहे आणि त्यावर लिहिलेला मजकूर मराठीतून आहे.

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
## Writ Petition No. 2101 of 2000

Mrs. Madhusri Shrivastava........ petitioner

**VS**

The Principal Sathye College and others...respondents
*Mr. V.M. Kanade for petitioner, Mr. Pradeep Jadhav for respondent no.4, Mr. K.M. Jawle for respondent no.1 and 2*

### CORAM; A.P. SHAH & S.J. VAZIFDAR JJ
### Dated 1.2.2001

P.C.

We have heard the learned counsel for the parties. Rule. By consent rule is made returnable forthwith. Respondents waive service.

The petitioner is working as a lecturer in English in the 1st respondent college with effect from 3.9.1991. The petitioner is M.A. in English and she has done D.H.E. in 1983 and M.Phil in 1988. She was appointed in reserved post of lecturer in English in September 1990. Her appointment was duly approved by the University.

Thereafter the petitioner was appointed every year since candidate from reserved category was not available. The advertisements which were issued from 1992, it is shown that the post of lecturer in English is reserved and thereafter every year the said post has been shown as reserved till the last advertisement which issued on 29.6.2000. The petitioner has completed 9 years in April 2000. In the circumstances the case of the petitioner is clearly covered by the circular of the University dated 17.7.1996. Under the said circular the reserved post is liable to be dereserved after 6 years if the reserved category candidate is not available and the person who has been working in the post is liable to be confirmed. In the instant case the petitioner has been working for last 9 years. We therefore direct the respondent nos.1 and 2 to forthwith forward their proposal to the University for dereservation of the post and absorption of the petitioner in accordance with the circular dated 17.7.1996. The University shall make appropriate recommendation to the State Government within two weeks from the date of receipt of the proposal from respondent nos.1 and 2. The State Government is directed to issue necessary orders for dereservation of the post held by the petitioner and for regularisation of her service in the 1st respodent as per the circular dated 17.7.1996 within a period of 8 weeks from the date of receipt of the proposal from the University.

Rule is made absolute in terms of prayer clause (a).

The parties and the authorities to act on the ordinary copy of this order duly authenticated by the personal secretary of this court.

*****

**श्री.अनिस अहमद :** सभापति महोदय, यह निवेदन अंग्रेजी मे दिया है. मेरा निवेदन है की माननीय सदस्य प्रश्न पर आयेंगे तो अच्छा रहेगा.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुण मेहता यांनी या ठिकाणी जी भावना व्यक्त केली तिच्याशी मी सहमत आहे.

**सभापती :** या प्रश्नाची पार्श्वभूमी आणि मा.मंत्रिमहोदयांनी त्या प्रश्नाला दिलेले उत्तर हे लक्षात घेता मा.मंत्रिमहोदयांजवळ पुरेशी आणि यथायोग्य माहिती उपलब्ध नाही असे दिसते. दुसरी गोष्ट अशी की, सन्माननीय सदस्य या संबंधी कितीही प्रश्न विचारत राहिले तरी त्यांना समाधानकारक आणि नेमके उत्तर मिळू शकेल अशी स्थिती दिसत नाही त्यामुळे हा प्रश्न मी राखून ठेवतो.

**श्री.रविन्द्र मिर्लेकर (बसून) :** सभापती महोदय, कॅबिनेट मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत तेव्हा ते राज्यमंत्र्यांना मदत का करीत नाहीत.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी आपण निर्णय दिलेला आहे. हा प्रश्न राखून ठेवण्यात आलेला आहे. सन्माननीय राज्यमंत्र्याकडे पुरेशी माहिती नसेल तर त्यांना मदत का करीत नाही असे आता सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी ज्या निवेदनाचा येथे उल्लेख केला ते निवेदन मराठीतून आहे आणि माननीय राज्यमंत्र्यांकडे जे निवेदन आहे ते इंग्रजीतून आहे. हे निवेदन इंग्रजीतून आहे की मराठीतून आहे, या तारखेला निवेदन दिले की त्या तारखेला निवेदन दिले हा महत्वाचा भाग नाही. या संदर्भातील महत्वाचा भाग असा आहे की, संचालकांच्या पातळीवर (अडथळा)... सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. सभापती महोदय, आपण हा प्रश्न राखून ठेवला आहे त्याबद्दल माझे काहीही म्हणणे नाही. या ठिकाणी खाली बसून जे बोलले गेले आहे ते प्रथेला धरुन नाही तेव्हा ते रेकॉर्डमधून काढून टाकण्यात यावे.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रश्नाच्या संदर्भात आपण निदेश दिले आणि हा प्रश्न राखून ठेवण्यात येईल असे आपण घोषित केलेले आहे. आपण निर्णय घेण्याच्या अगोदर सन्माननीय मंत्रिमहोदयांना काही म्हणावयाचे असेल तर ते म्हणण्याचा त्यांना अधिकार होता. त्यामध्ये पाच मिनिटांचा वेळ वाया गेला. त्या वेळी ते उत्तर देऊ शकले असते. मा.राज्यमंत्र्यांची जी काही अडचण व्हावयाची होती ती त्यांनी होऊ दिली. माननीय सभापती महोदयांनी निर्णय दिल्यानंतर त्यावर मल्लीनाथी करण्यासाठी ते उभे राहिले आहेत. तेव्हा त्यांचे म्हणणे सुद्धा रेकॉर्डमधून काढून टाकण्यात यावे. त्यांनी आपला अपमान केलेला असल्यामुळे त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर ठेवण्यात येवू नये.

**श्री.अनिस अहमद :** सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे. यह तो मेरे उपर अन्याय हो रहा है.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

**सभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. मी अन्याय केला आहे असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय? या बाबतीत आपण मला स्पष्टपणे सांगा. दोन तीन वेळा प्रश्न विचारुन सुद्धा विचारलेल्या प्रश्नांची अचूक आणि नेमकी उत्तरे सभागृहात मिळत नाहीत आणि त्यामुळे मी हा प्रश्न राखून ठेवला. आता नामदार मंत्री महोदय उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, कोणी सदस्यांनी बसून त्यांचेबाबत जे कॉमेंटस केली आहेत ती रेकॉर्डवर येता कामा नयेत, तर बसून केलेली कॉमेंटस ही रेकॉर्डवर येणार नाहीत आणि आली असलीच तर ती काढून टाकली जातील. नामदार मंत्र्यांनी एवढीच विनंती केलेली आहे की, अशी या प्रश्नाच्याबाबत पार्श्वभूमी असतानाही विशिष्ट प्रकारची कॉमेंटस सदस्यांनी बसून केलेली आहे तर ती रेकॉर्डवर येणार नाहीत याची काळजी घ्यावी आणि मी ती घेईन.... आता मी पुढील प्रश्न पुकारलेला आहे आणि त्या प्रश्नाचे उत्तर देण्यास संबंधित मंत्री महोदय तयार आहेत...

**श्री.दिवाकर रावते :** अध्यक्ष महाराज, माननीय राज्यमंत्री विदर्भातील असल्याने पश्चिम महाराष्ट्रातील मंत्री महोदय त्यांना मदत करीत नव्हते असे आहे का? असे असेल तर ते बरोबर नाही...

(अनेक सदस्य बोलण्यासाठी परवानगी मागण्याकरिता उभे राहतात....)

**सभापती :** आता आपण सर्व खाली बसा. मघा कोणी सदस्यांनी बसून हेत्वारोप केला होता आणि आता आपण उभे राहून तसेच करीत आहात. याठिकाणी विदर्भातील मंत्री आणि पश्चिम महाराष्ट्रातील मंत्री असे काहीही नाही. तेव्हा आपले हेही बोलणे हे कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

**श्री.प्रमोद नवलकर :** अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, कोणताही एखादा तारांकित प्रश्न

सभागृहात आल्यानंतर तो माननीय सभापतींकडून राखून ठेवला जाणे ही अत्यंत दुर्दैवाची बाब असते. त्यावर भरपूर खर्च झालेला असतो, ती समस्या सोडविण्यासाठी सदस्यही आतुर असतात परंतु तो प्रश्न सभागृहात आल्यानंतर सदस्यांनी विचारलेली माहिती मंत्री महोदय योग्य प्रकारे देऊ शकत नसतील वा माहिती अपुरी असेल तर नाईलाजाने तो प्रश्न राखून ठेवावा लागतो. परंतु या ठिकाणी या प्रश्नाच्या बाबतीत परिस्थिती वेगळी आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेली माहिती अपुरी होती आणि त्यामुळे आपण, सभापती महोदय, तो प्रश्न राखून ठेवला. खरे तर या प्रश्नाबाबतची आवश्यक ती सर्व माहिती माननीय मंत्रीमहोदय, जे सभागृहात उपस्थित आहेत त्यांचेकडे आहे, होती, ती जर वेळीच सभागृहापुढे दिली गेली असती तर कदाचित हा प्रश्न राखून ठेवण्याची वेळ आली नसती. परंतु सभागृहात माननीय मंत्री महोदय हजर असतानाही आणि त्यांचेकडे ती माहिती असतानाही त्यांनी सभागृहाला ती माहिती दिली नाही वा तशी तयारी दाखविली नाही. ही गंभीर बाब आहे. सभागृहामध्ये राज्यमंत्री उत्तर देत असताना मंत्री उपस्थित असतात तेव्हा त्यांचेकडून सहकार्य अपेक्षित असते. आणि त्यांच्या उपस्थिती मध्ये त्यांचा प्रश्न राखून ठेवला जातो व त्यावेळी ते काही बोलत नाहीत ही गंभीर बाब आहे. वास्तविक अशा वेळी उभे राहण्याचे साधे सौजन्य मंत्री महोदय दाखवित नाहीत आणि त्यांचेजवळ असलेली माहिती सभागृहापासून लपवून ठेवतात हेही बरोबर नाही. माझ्याकडे याबाबतची माहिती आहे आणि आपण ती सभागृहाला देऊ इच्छितो असे त्यांना त्यावेळी सांगायला पाहिजे होते. पण आपण यासाठी १५ मिनिटे त्यांना संधी दिली होती पण त्या काळात ते साधे उभे देखील राहिले नाहीत. खरे तर अशा मंत्र्यांना, आता येथे माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत त्यांना मी सांगु इच्छितो की, आपण त्यांना आपल्या मंत्रिमंडळात ठेऊ नका. जे मंत्री सभागृहात आपले कर्तव्य पार पाडीत नाहीत, जे आपल्या सहकारी राज्यमंत्र्यांना अडचणीत आले असताना केवळ पहात राहतात, मदत करीत नाहीत त्यांना मंत्रिमंडळामध्ये स्थान आपण द्यायला नको. त्यांना याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांकडून तंबी मिळेल तेव्हा मिळेल. पण अध्यक्ष महाराज, अशा प्रकारे एखादा प्रश्न राखून ठेवला जातो तेव्हा त्यामुळे सभागृहाचा वेळ आणि त्यावर आतापर्यंत आलेला खर्च हा वाया ठरतो. त्यामुळे अशी प्रवृत्ती आताच मोडून काढली पाहिजे, त्यामुळे आपण मंत्री महोदयांना याबद्दल ताकीद द्यावी.

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : अध्यक्ष महाराज, आज हा जो प्रश्न येथे उपस्थित झाला त्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय राज्यमंत्र्यांनी मला अगोदरच विनंती केली होती की, मला या प्रश्नाचे शेवटपर्यंत उत्तर द्यायचे आहे. कृपया तुम्ही याचे उत्तर देऊ नका आणि ते हेही सांगण्याचा प्रयत्न करीत होते.... सभापती महोदय, हे अधिवेशन विदर्भात होत आहे. तसेच ते विदर्भातील मंत्रिमहोदय आहेत. तसेच ते योग्य त्या डायरेक्शनमध्ये प्रश्नाचे उत्तर देत आहेत. आता माननीय सभापतींनी जो काही निर्णय दिला आहे, त्यामध्ये मला जावयाचे नाही. माननीय सभापतींनी दिलेला निर्णय आम्ही मान्य केलेला आहे. तशी आमची भूमिका राहिली आहे. माननीय राज्यमंत्री या ठिकाणी प्रश्नांचे योग्य दिशेने उत्तर देत होते. आता एमफक्टोनेच निवेदन दिले आहे, त्यातील काही भाग मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी उद्घृत केला आहे. त्यावेळी मा.राज्यमंत्र्यांनी सांगितले की, माननीय सदस्यांकडे मराठी प्रत आहे, माझ्याकडे इंग्रजी प्रत उपलब्ध आहे. आता या ठिकाणी हा प्रश्न मा.सभापतींनी राखून ठेवला आहे. आता या ठिकाणी माझ्या सहकाऱ्याची बदनामी व्हावी. माझ्या सहकाऱ्याची अडचण व्हावी अशा प्रकारचा हेत्वारोप या ठिकाणी समोरच्या सदस्यांकडून करण्यात येत आहे. म्हणून या ठिकाणी जो काही हेत्वारोप करण्यात आला आहे, तो सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकला पाहिजे. माननीय राज्यमंत्री महोदय या ठिकाणी योग्य दिशेने उत्तर देत होते. मी त्यांच्याच बाजूला त्यांना मदत करण्यासाठी बसलो आहे. या प्रश्नाचे उत्तर मला द्यावयाचे आहे, असे त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी त्यांना उत्तर देण्यास परवानगी दिली. म्हणून या ठिकाणी जो काही हेत्वारोप करण्यात आला आहे, तो सभागृहाच्या कामकाजातून काढला पाहिजे. या ठिकाणी सभागृहाचा वेळ विनाकारण घेतला गेला आहे, असे होता कामा नये.

(गोंधळ)

**श्री.प्रमोद नवलकर** : मंत्र्यांकडे मराठी प्रत असताना ते उभे का राहिले नाहीत.

(गोंधळ)

**श्री.विजय गिरकर** : सभापती महोदय...

**सभापती** : सर्व माननीय सदस्यांनी खाली बसावे.

(गोंधळ)

आता या ठिकाणी मी कोणालाही बोलू देणार नाही. उलट जे काही बोलले गेले आहे, ते काढून टाकण्याचा निर्णय मला द्यावा लागणार आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी मला अशी विनंती केली की, सभागृहात खाली बसून जो काही हेत्वारोप केला आहे, तो सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावा. या ठिकाणी बसून जे काही बोलले गेले असेल ते काढून टाकण्यात येईल. आता याठिकाणी विचारलेल्या प्रश्नाची माहिती लगेच यावयाला पाहिजे. या ठिकाणी प्रश्नाचे उत्तर कोणी द्यावयाचे हे त्यांनी आपसात ठरविले असेल. आता याठिकाणी शासनाच्या वतीने कोणीही उत्तर द्यावे. परंतु देण्यात येणारे उत्तर हे समाधानकारक असले पाहिजे, एवढीच या ठिकाणी अपेक्षा आहे. आता हे उत्तर मा.मंत्रिमहोदयांनी देवो, अथवा राज्यमंत्र्यांनी देवो. राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर समाधानकारक नसेल, पुरेसे नसेल तर त्यांनी त्याबाबत काय करावयाचे ते ठरवावे. या ठिकाणी हेत्वारोप करण्यात आले आहे. तसेच विदर्भ वगैरे इ.शब्द या ठिकाणी आले आहेत.

**श्री.विजय गिरकर** : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनीच असे म्हटले आहे की, राज्यमंत्री विदर्भाचे असल्यामुळे त्यांना संधी देत आहे.

**सभापती** : एखाद्या विषयासंबंधी पॉझिटिव्ह उल्लेख करणे आक्षेपार्ह नाही. त्यांचे आपसात ठरले आहे की, अधिवेशन विदर्भात आहे, प्रश्न विचारणारे अभ्यासू सदस्य विदर्भातील आहेत तेव्हा आपल्याला उत्तर मिळण्याशी कर्तव्य आहे. त्यांनी सांगितलेले आक्षेपार्ह नाही. परंतु संबंधित दोन्ही मंत्र्यांनी एकत्र बसून ठरविले आहे की, या प्रश्नाचे उत्तर राज्यमंत्री विदर्भातील असल्यामुळे त्यांनी दिले तर चांगले दिसेल. अशाप्रकारे दोघांचे आपसात ठरले असेल तर आपल्याला काय करायचे ? परंतु विदर्भासंबंधी निगेटीव्ह उल्लेख केला तो चांगला नाही. विदर्भातील अमूक राज्यमंत्र्यांचे मुद्दाम हसे व्हावे म्हणून त्यांनी केले असा केलेला उल्लेख बरोबर नाही. विदर्भ या विषयाच्या संदर्भामध्ये मी सभागृहामध्ये सांगतो की, या संदर्भामध्ये सभागृहात चांगल्या रितीने व्यवस्थित रितीने जर कुणाला चर्चा करायची असेल तर त्यांनी रितसर अशाप्रकारचा त्यासंबंधीचा प्रस्ताव द्यावा. परंतु अशापद्धतीने विदर्भासंबंधीचा प्रश्न वेड्यावाकड्या मार्गाने उपस्थित केला जाणे मला अत्यंत क्लेषकारक वाटते. हा विषय मी आता इथेच संपवितो. यासंबंधी काही होणार नाही. मी पुढील प्रश्न पुकारला आहे. तो पुन्हा पुकारतो.

*****

**AIR, 1989, SUPREME COURT, 1607**
(From Gujarat)
**G.L. Oza and K. Jagannath Shetty, JJ**
**Civil Appeals Nos. 2704-06 of 1979 D/21/4/1989**

Shri Anandi Mukta Sadguru Shree Muktaji Vandasriswami Suvarna Jayanti Mahotsav Smarak Trust and Others, **Appellants**

**V/S.** V.R. Rudani and others, **Respondents.**

(A) GUJARAT UNIVERSITY ACT (6 of 1973), S-33-Affiliated Colleges- Closure of College - Payment of Salary and other benefits - Management is primarily responsible under relationship of master and servant - Refusal to make full payment unless State compensates- Not tenable.

Having heard the Counsel for both parties, we are left with an impression that the appellants are really trying to sidetrack the issue and needlessly delay the legitimate payments due to the respondents. The question whether the state is liable to recompense the appellants in respect of the amount payable to the respondents was not considered by the High Court and indeed could not have been examined since the state was not party to the proceedings. However, by the persuasive powers of the counsel in this court the state has been impleaded as a party in the appeals. Perhaps this court wanted to find out the reaction of the state on the appellants' assertion for reinstatement. We heard counsel for the state. He disputes the appellants' claim. In fact, he challenges the claim on a number of grounds. He says that the state is under no obligation to pay the appellants as against the sum due to the respondents. We do not think that we need rule today on this controversy. It is indeed wholly outside the scope of these appeals. We are only concerned with the liability of the management of the college towards the employees. Under the relationship of master and servant, the management is primarily responsible to pay salary and other benefits to the employees. The management cannot say that unless and until the state compensates, it will not make full payment to the staff. We cannot accept such a contention.

# नमुने व प्रपत्रे वारंवार बदलल्यामुळे सुधारित वेतनश्रेणीची थकबाकी देण्यास होणारा विलंब

***महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर २००० : तिसरे अधिवेशन २०००***

*दिनांक ३० नोव्हेंबर, २००० रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ९०५४ चे सुधारित उत्तर*

**सर्वश्री बी.टी.देशमुख, व्हि.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प.म.पाटील,** विधानपरिषद सदस्य : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय-

१) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारीत वेतनश्रेणीची थकबाकी देण्यासाठी दिनांक १ मे २००० रोजीच्या शासननिर्णयान्वये संपुर्ण अर्थसंकल्पीय तरतूद (रुपये ४०० ते ५०० कोटी) उच्च शिक्षण संचालकाकडे शासनाने सुपूर्त केल्यानंतरही थकबाकी सादर करावयाच्या नमुन्यामध्ये वारंवार बदल करणे, असे नमुने भरुन सादर करण्यासाठी प्राचार्यांना पुरेसा वेळ न देणे, अनेकवेळा असे नमुने भरुन पाठविण्याची मुदत निघुन गेल्यावर त्या मुदतीत प्रपत्रे भरुन पाठवावी असे आदेश देणे, अशा कारभारामुळे थकबाकी अदा करणेच्या कामात उच्च शिक्षण संचालकांना संपूर्णपणे अपयश आले आहे अशी तक्रार, शेकडो शिक्षकांनी पुणे येथे उच्च शिक्षण संचालकांच्या कार्यालयासमोर १ ऑक्टोबर २००० रोजी केलेल्या धरणे आंदोलनाच्या वेळी, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (एमफक्टो) अध्यक्ष व सचिवांनी उच्च शिक्षण संचालकांना एक निवेदन देवून केलेली आहे हे खरे आहे काय,

२) असल्यास, शिक्षण संचालकांच्या आदेशावरुन सहसंचालक,उच्च शिक्षण, पुणे विभाग यांनी वेळोवेळी नमुने व प्रपत्रे बदलविण्याची उदाहरणे दिनांक १ ऑक्टोंबर, २००० रोजीच्या या तक्रार निवेदनामध्ये नमूद आहेत, हे खरे आहे काय,

३) असल्यास, उच्च शिक्षण संचालकांच्या आदेशावरुन सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांनी ११ मे २००० रोजी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र पाठवून सर्व नमुने १७ मे, २००० पर्यंत भरुन पाठविण्याच्या सूचना निर्गमित केल्या, पुन्हा नमुन्यामध्ये बदल करणारे पत्र ५ जुलै,२००० रोजी पाठवून १० जुलै २००० पर्यंत माहीती पाठवा अशा सूचना निर्गमित केल्या, पुन्हा ५ जुलैच्या सूचनांमध्ये बदल करणारे आदेश १३ जुलै, २००० रोजी निर्गमित केले हेही खरे आहे काय,

४) असल्यास, उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे वा करण्याचे योजिले आहे,

५) अद्याप कोणतीच उपयोजना केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण** : (१) होय.

(२) होय.

३) होय.

(४) व (५) शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांनी नोव्हेंबर अखेपरर्यंत ४०२ महाविद्यालयांची रुपये २१८ कोटीची देयके मंजूर केलेली असून प्रत्यक्ष थकबाकी वितरणाचे काम सुरु झाले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** मा.सभापती महोदय, प्रश्न भाग १ च्या लेखी उत्तरामध्ये ९.१०.२००० रोजी निवेदन देण्यात आलेले आहे, ते मिळाले काय या प्रश्नाला 'होय' असे उत्तर दिलेले आहे. सहसंचालक पुणे यांनी नमुने आणि प्रपत्रे बदलविण्याची तक्रार निवेदनामध्ये केलेली आहे काय? या प्रश्न भाग २ ला देखील 'होय' असेच लेखी उत्तर दिलेले आहे. उच्च शिक्षण संचालकांच्या आदेशावरुन सहसंचालकांच्या आदेशावरुन नमुन्यामध्ये बदल करण्याचे आदेश गेले आहेत हे खरे आहे का? या प्रश्नाला देखील 'होय' असे उत्तर देण्यात आलेले आहे. या बाबतीत काय उपाययोजना करण्यात आली आहे या प्रश्नाला "शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांनी नोव्हेंबर अखेरपर्यंत ४०२ महाविद्यालयांची रुपये २१८ कोटीची देयके मंजुर केलेली असून प्रत्यक्ष थकबाकी वितरणाचे काम सुरु झाले आहे" असे उत्तर दिलेले आहे. या ठिकाणी ८० टक्के म्हणजेच ७०० कोटी रुपयांची मदत गव्हर्नमेंट ऑफ इंडियाकडून मिळणार आहे. केंद्राकडून आतापर्यंत किती मदत मिळाली आहे? हा माझा पहिला प्रश्न. आता थकबाकी देण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. इतर विभागांनी हे काम दोन तीन महिन्यामध्ये संपविले. यांना ६-७ महिने झाले तरी काम संपवता येत नाही. सध्या ८०-९० टक्के थकबाकी

## CHANGE OF ADDRESS
## ACKNOWLEDGEMENT NO.17

Requests for changes in address for the purpose of mailing and correspondence, have been reaching us frequently from the members'. So to record these changes in Life Member's Register systematically, and to follow up these changes effectively, steps have been taken by The Treasurer.

2. We hereby acknowledge the receipt of the requests for change in address from members whose Life Membership Numbers and changed addresses are included in Twentysecond List of Changed Addresses of Life Members of NUTA. Details of the said list are as follows:-

TWENTYSECOND LIST:- Serialized Nos : of the changed Addresses from 911 to 971 (Notified in 2001 Ex. File on Pages 4 to 6) The Life membership Numbers of those requesting members are as follows :-

4, 112, 113, 332, 348, 426, 558, 678, 808, 1185, 1267, 1277, 1393, 1395, 1414, 1485, 1525, 1567, 1611, 1654, 1748, 1803, 1869, 1884, 1925, 2107, 2145, 2164, 2285, 2290, 2358, 2424, 2464, 2465, 2569, 2592, 2594, 2644, 2699, 2864, 2882, 2909, 2912, 2913, 2966, 3005, 3011, 3140, 3251, 3303, 3339, 3356, 3433, 3483, 3573, 3612, 3638, 3665, 3894, 3944, 4081.

3. No separate and individual acknowledgement shall be issued in this regard.

4. Hereafter requests for change in address shall be sent only to me. (Prof. S.A. Tiwari, Treasurer NUTA, 42, Shankar Nagar, Amravati-444 606.)

5. Members may please note that such requests sent to any other office bearer of NUTA Executive may not be speedily and effectively followed up. We hope that the members shall continue to cooperate with us to serve them better.

6. List No. 21 containing address changes from 863 to 910 was published as Acknowledgement No. 16 on page No. 88 of 2000 NUTA Bulletin.

26.02.2001 S.A. Tiwari
Treasurer NUTA

## RULES FOR PROPOSING AMENDMENTS

**(Reproduced from page 97 of 1977 NUTA Bulletin)**

1. Any proposal before the meeting may be amended
(a) by leaving out a word or words or
(b) by leaving out a word or words in order to add or insert a word or words or
(c) by adding or inserting a word or words.

2. An amendment to be in order shall :
(a) not constitute a direct negative to the original resolution :
(b) be relevent to and within the scope of the resolution to which it is moved.

दिली जात आहे. शंभर टक्के थकबाकी अदा करण्याचे हे संपुर्ण काम केव्हा संपणार आहे? खुद्द हे अधिवेशन चालू असताना भ्रष्टाचारी अधिकाऱ्यावर रेड पडली. मी हा प्रश्न का विचारतो हे आपल्या लक्षात येणे आवश्यक आहे. थकीत बाकी देण्याचे काम ज्यांच्याकडे आहे त्यांना वाटते की, एवढ्या मोठ्या रकमेचे चेक जे आहेत ते आपण वाटणार? आपली काही आरती, काही पूजा होणार की नाही? एवढ्या मोठ्या थकबाकीला अदा करताना त्यांच्या हाताला थरकाप सुटतो. वर्तमानपत्रातून आलेले आहे की, उच्च शिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकाऱ्याकडे लाखोची माया सापडली. १० नोव्हेंबर २००० रोजीच्या हितवाद मधील बातमी मी आपल्याला वाचून दाखवितो.त्या बातमीत म्हटलेले आहे की, "Disproportionate assets worth over Rs.8.61 lakh was unearthed during raids on residential premises of Administrative officer with office of Joint Director, Higher Education located at Sakkardara, on Thursday." The swoop was follow-up of inquiry that was initiated during his Amravati stint.

मी हे सर्व आपल्याला मुद्याम यासाठी सांगत आहे. याचे कारण असे आहे की, तुम्ही जो पर्यंत ठामपणाने सांगत नाही की, एक महिन्यात यांची सर्व थकबाकी चुकती करा तो पर्यंत हे काम होणार नाही. मी या ठिकाणी कोणावरही आरोप केलेला नाही. दोन चार वर्तमानपत्रातून याबावत बातम्या आलेल्या आहेत. लाखो रुपये या अधिकाऱ्याच्या बँकेतून लॉकरमधून निघाले आहेत. लोकमत मध्ये बातमी आहे त्याचे लॉकर्स सील केले होते. उघडले त्यावेळी त्यामधून १३ लाख ५६ हजार रुपये मिळाले. माझे म्हणणे असे आहे की, अशा अधिकाऱ्यांच्या भोवती लोकांना चकरा मारायला लावू नका. एका महिन्यामध्ये ही सर्व थकबाकी सर्वांना दिली पाहिजे असे आदेश आपण आपल्या अधिकाऱ्यांना द्याल का? केंद्र सरकारकडून आता पर्यंत किती मदत मिळाली आणि किती मदत मिळणे अपेक्षित आहे? एका महिन्यामध्ये ८०-९० टक्के नाही. संपूर्ण थकबाकी एका महिन्यामध्ये दिली जाईल काय?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : सभापती महोदय, विद्यापीठ कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केल्यानंतर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यासाठी २०००-२००१ या वर्षात ४८६.२३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पैकी केंद्र सरकाकडून आतापर्यंत २६१ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी विचारला. त्यावेळी पाचवा वेतन आयोग आला आणि फरक देण्याचा प्रश्न निर्माण झाला त्यासाठी जी विवरणपत्रे सादर करावयाची आहेत ती निर्दोष असावित असा प्रयत्न शिक्षण संचालनालयाचा होता. यापूर्वी चौथा वेतन आयोग लागू करण्यात आला त्यावेळी घाईगर्दीने विवरणपत्रे सादर केली गेल्यामुळे काही अडचणी निर्माण झाल्या होत्या म्हणून पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी शिक्षण संचालनालयाने जळगावचे जॉईन्ट डायरेक्टर श्री.नाफडे यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली आणि त्यांनी विवरणपत्रे तयार करुन विभागाला सादर करावीत अशी सूचना करण्यात आली होती. हे सादर केल्यानंतर ते नमुने जॉईन्ट डायरेक्टरच्या माध्यमातून महाविद्यालयांना पाठविले गेले. त्यामध्ये टाईम टू टाईम काही दुरुस्त्या सुचविण्यात आल्या. काही बदल करण्यात आले. एक-दोन वेळा असे बदल झाले. जॉईन्ट डायरेक्टर, नागपूर यांच्याकडून ३ वेळा वेगवेगळ्या तारखा कळविल्या गेल्या त्यामुळे तेथील महाविद्यालयांची थोडी गैरसोय झाली. पण यामध्ये कालहरण करण्याचा किंवा निधी नाकारण्याचा शासनाचा कोणताही प्रयत्न नव्हता. यापूर्वी बिले सादर करण्यास जी मुदत दिली असेल त्या मुदतीमध्ये ज्या महाविद्यालयांची बिले सादर करण्याची राहिली असतील त्यांनी ३० डिसेंबर पर्यंत बिले सादर केली तर ३१ मार्च पर्यंत त्यांची सर्व थकबाकी देण्याचा प्रयत्न केला जाईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महोदय, ज्यांची बिले दाखल झाली नाहीत त्यांच्याबद्दल मी काहीच बोलत नाही. मला त्यांच्याबद्दल बोलायचे नाही. त्यांना आपण ३० डिसेंबरपर्यंत मुदत दिली ती योग्य आहे. पण नमुने व प्रपत्रे यामध्ये सहा महिन्यामध्ये तीन वेळा बदल झाले. आता डिसेंबर अखेरपर्यंत जी महाविद्यालये बिले सादर करतील त्यांना आपण ३१ मार्चपर्यंत थकबाकी द्याल त्याला माझी हरकत नाही. माझा प्रश्न असा आहे की, या लोकांच्या, आपल्या अधिकाऱ्यांच्या या वृत्तीला आळा घालण्यासाठी मी आपल्याला सांगू इच्छितो की, बायंडिग व्हॉल्यूम मध्ये ज्यांनी यापूर्वीच बिले सादर केले आहेत त्यांची संपूर्ण थकबाकी या महिन्यात दिली पाहिजे. तरी २१ डिसेंबरपर्यंत ही संपूर्ण थकबाकी ज्यांनी यापूर्वी बिले सादर केलेली आहे त्यांना देण्याचे सक्त आदेश आपण आपल्या अधिकाऱ्यांना द्याल काय?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : अध्यक्ष महाराज, राज्यामध्ये जवळपास ८५० कॉलेजेस आहेत. एका कॉलेजचा प्रस्ताव तपासावयाचा झाला तर त्यासाठी एक दोन दिवस लागतात. त्यामुळे ८५० महाविद्यालयासाठी लागणारा कालावधी लक्षात घेतला तर त्यासाठी दीर्घ काळ लागणार आहे. तरीसुध्दा मी आपणास सांगू इच्छितो की, राज्यातील ४०२ कॉलेजना २१७ कोटी रुपये वितरीत करण्यासाठी तरतूद ऑलरेडी वितरीत केली आहे. आज राज्यासमोर काही आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे ट्रेझरीमध्ये बिले मंजुर होण्यासाठी उशीर लागत आहे. तरी ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले आहेत आणि संचालनालयाने ते तपासून मान्य केलेली आहेत ते वेगवेगळ्या संचालनालयामध्ये असलेले सगळे प्रस्ताव १५ दिवसांमध्ये क्लिअर करण्याचे निदेश दिले जातील.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, ज्यांनी यापूर्वीच थकीत बाकीचे बिले व नमुने प्रपत्रे सादर केलेली आहेत त्या सर्वांना १५ दिवसांमध्ये त्यांची संपूर्ण थकबाकी दिली जाईल काय?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : होय.

*****

## विदर्भातील नगरपरिषदेतील अस्थायी शिक्षकांना कायम करण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद :* *: तिसरे अधिवेशन २०००*

***बुधवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०००***

(५३) * ९३५४. **सर्वश्री सुरेश पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, प.म.पाटील, दिवाकर पांडे, श्रीमती इंदुमती नाकाडे, सर्वश्री प्रकाश जावडेकर, सुरेश भालेराव, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री सुभाष देशमुख, जगदीश गुप्ता, रामदास तडस** : तारांकित प्रश्न क्र.७६१३ ला दि.१९ जुलै,२००० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय-

(१) विदर्भातील नगरपरिषदेतील अस्थायी शिक्षकांना सेवेत कायम करण्यासंबंधाचे आदेश निर्गमित करण्यात आले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, केव्हा;

(३) उक्त आदेश निर्गमित केले नसल्यास, याबावत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.विलासराव देशमुख** : (१), (२) व (३) विदर्भातील नगरपरिषदेतील व इतर महसूल विभागांतील नगरपरिषदेतील अस्थायी शिक्षकांना सेवेत कायम करण्याबाबत संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना शासनाने दि.३१.८.२००० च्या शासन पत्रान्वये आदेश दिले आहेत. त्यानुसार विदर्भातील १९ नगरपरिषदेतील १५१ शिक्षकांना आतापर्यन्त कायम केल्याचे आदेश संचालनालयाने निर्गमित केले आहेत.

उर्वरित नगरपरिषदांच्या शिक्षकांच्या छाननी संचालनालयाकडून करण्यात येत आहे.

*****

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Offset, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO. ATI 263** Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **14.04.2001**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,.......................................................
.......................................................
.......................................................
.......................................................
.......................................................